बृहन्महाराष्ट्र वृत्त

वर्ष ४६
अंक २

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

फेब्रुवारी २०२६
माघ/ फाल्गुन
शके १९४७

नमस्कार मंडळी

नुकताच आपण भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला. गेल्या काही वर्षांत भारताने सर्व क्षेत्रांत केलेली प्रगती अत्यंत कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे. अलीकडेच भारताने जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले असून, हे सर्व भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल सर्व भारतीयांचे मनःपूर्वक अभिनंदन!

अमेरिका–भारत संबंधांतील तणावाचा परिणाम काही स्थलांतरित भारतीयांच्या नोकऱ्या, शिक्षण व दैनंदिन जीवनावर जाणवत आहे. या परिस्थितीत लवकरात लवकर सकारात्मक तोडगा निघावा, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. दरम्यान, मिनेसोटा राज्यात ICE अधिकाऱ्यांच्या छाप्यांमुळे स्थलांतरित लोकांमध्ये भीती व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा वेळी सर्व स्थलांतरित भारतीयांनी योग्य ती काळजी घेऊन, माहितीपूर्ण व विचारपूर्वक वर्तन ठेवावे, असे नम्र आवाहन मी करतो.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२६ अधिवेशनाच्या दृष्टीने जानेवारी महिना अत्यंत महत्त्वाचा ठरला. मकर संक्रांतीच्या कार्यक्रमानिमित्त मी सिॲटल् येथे गेलो असताना, अधिवेशनाच्या तिकीट विक्रीची अधिकृत घोषणा मंचावरून करण्यात आली. यावेळी अधिवेशनाचे संयोजक, मोहित चिटणीस, तसेच सिॲटल् महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष, अपूर्व चिंचवडकर, तसेच सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर मी आणि मोहित चिटणीस यांनी व्हँकूवर येथील संक्रांतीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावून तेथील मंडळींना अधिवेशनात सहभागी होण्यासाठी आवाहन केले. या अधिवेशनात दर्जेदार, विचारप्रवर्तक आणि मनोरंजक असे अनेक उत्तम कार्यक्रम घेऊन येण्याचा आमचा मानस आहे. अधिवेशनाचा सविस्तर वृत्तांत, तसेच वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ) यांची उत्तरे तुम्हाला या अंकात वाचायला मिळतील. तरी कृपया लवकरात लवकर तिकीट काढून आपला सहभाग नोंदवा. सर्व मंडळांच्या अध्यक्षांना त्यांच्या-त्यांच्या मंडळांसाठी खास तयार केलेल्या मंडळ-विशिष्ठ तिकीट लिंक पाठवण्यात आल्या आहेत. या लिंकद्वारे साधारण एकाच वेळी तिकीट खरेदी केल्यास, मंडळातील सभासदांना अधिवेशनातील मुख्य सभागृहात एकमेकांच्या जवळ बसायला मिळेल.

गेल्या महिन्यात फिलाडेल्फिया येथे BMM-PMM प्रादेशिक इनडोअर क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. यंदा या स्पर्धेत विक्रमी १४ संघांनी सहभाग घेतला, ज्यात ४ महिला संघ आणि १० पुरुष संघ होते. फिलाडेल्फिया, सेंट्रल पेनसिल्व्हेनिया, न्यू जर्सीचे 'मराठी विश्व' मंडळ आणि डेलावेर व्हॅली या मंडळांचा सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला.आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन देणाऱ्या सर्व मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी, तसेच सहभागी खेळाडू, संयोजक व प्रायोजक यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार. विशेषतः यजमान फिलाडेल्फिया मंडळाच्या अध्यक्षा सुचित्रा शिंदे आणि त्यांच्या समितीने या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल त्यांचे व सर्व स्वयंसेवकांचे अभिनंदन. अशा उपक्रमांमुळे मंडळांमधील संपर्क वाढतो, नवी मैत्री निर्माण होते आणि सहकार्याची भावना अधिक दृढ होते.

गेल्या महिन्यात आम्ही “आरोग्य संपदा” हे नवे सदर सुरू केले आहे. या उपक्रमाअंतर्गत उत्तर अमेरिकेतील विविध क्षेत्रांतील नामवंत डॉक्टर व आरोग्यतज्ज्ञ आपल्याला आरोग्य, रोगप्रतिबंध, आणि काळजी याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. हा उपक्रम आपल्या सर्वांच्या सर्वांगीण आरोग्यकल्याणासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

"मराठवाडा पूरग्रस्त निधी संकलन" यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत जवळजवळ ४०,००० डॉलर्सचा निधी महाराष्ट्रात पाठवण्यात आला, तर आम्ही ज्या संस्थांसोबत काम केले त्यांनी २३,००० डॉलर्सपेक्षा अधिक निधी उभारला. एकत्रितपणे आपण ६३,००० डॉलर्सपेक्षा अधिक मदत महाराष्ट्रात पाठवू शकलो. या उदात्त कार्यासाठी योगदान दिलेल्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार.

मकर संक्रांतीच्या निमित्ताने “महिला सक्षमीकरण” अंतर्गत “आशा प्रकल्प” जाहीर करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा उद्देश ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांमध्ये स्तन कर्करोगाबाबत जनजागृती वाढवणे आणि या कार्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या महाराष्ट्रातील “आशा कार्यकर्त्यांना” थेट पाठबळ देणे हा आहे.

त्याचप्रमाणे, मराठी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी “पेशवाई” वर आधारित अभ्यासक्रम देखील जाहीर करण्यात आला आहे. डिसेंबर महिन्यात आम्ही छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित असा अभ्रासक्रम जाहीर केला होता.

वरील काही उपक्रमांची सविस्तर माहिती तुम्हाला या अंकात वाचायला मिळेल.

शेवटी, तुम्हा सर्वांना येणाऱ्या महाशिवरात्री, छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती, तसेच मराठी भाषा गौरव दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

जय हिंद - जय महाराष्ट्र! आपला,

- प्रसाद पानवळकर अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-

BMM Treasurer - Santosh Salvi
4 Azalea Lane, Nashua, NH 03062
Ph: 603 438 9279
Email: santosh.salvi@bmmonline.org

जाहिरातींचे दर: पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

Send your payments to: zelle@bmmonline.org

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)

मताधिकार असलेले सदस्य

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

नियुक्त सदस्य

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

विश्वस्त समिती

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

या अंकात

अध्यक्षीय	१
बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती	२
२०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल	३
राशिभविष्य	५
२०२६ सिॲटल अधिवेशन (FAQ)	५
भावपूर्ण श्रद्धांजली: दादा दामले	७
(काव्यस्पर्धा) प्रेम, प्रेम म्हणजे	८
मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी संकलन अहवाल	९
पेशवाई अभ्यास वर्ग	९
Project ASHA BMM Fundraiser	१०
देवभूमी ट्रेल्स : महाराष्ट्राच्या पवित्र वारशाचा सखोल अनुभव	११
कविता: युध्दस्य कथा ...	११
अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख	१२
तुमचा उत्कर्ष तुमच्या हातात: भाग २	१३
शनिवार वाडा ते गेटवे ऑफ इंडिया	१५
कविता: बाकडे....	१६
माझा (नेहमीचाच) प्रवास	१६
कॅलिफोर्नियातील महाराष्ट्रीयन उपहारगृहांचा (रेस्टॉरंटसचा) इतिहास	१८
बदलत्या आकाशाच्या नव्या वेधशाळा	१९
सत्त्व ते शिवत्व – एक अंतर्मुख प्रवास	२२
जाहिरात	२४
MANA Paintings	२५
Annual Financial Report: Year 2025	२६

संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :

Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

२०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

६-९ ऑगस्ट २०२६, सिॲटल्

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नमस्कार. नुकत्याच साजऱ्या झालेल्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या तसेच येणाऱ्या शिवजयंती आणि मराठी भाषा दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!! 🌸
SMM तर्फे १७ जानेवारी रोजी मकर संक्रांत विशेष कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. या आनंददायी व मंगल प्रसंगी बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनाच्या नोंदणीचा शुभारंभ करण्यात आला. या महत्त्वाच्या क्षणी बीएमएमचे अध्यक्ष **मा. श्री. प्रसाद पानवळकर** हे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे नोंदणी शुभारंभ कार्यक्रम अधिकच उत्साहवर्धक व प्रेरणादायी ठरला. मोठ्या संख्येने सभासदांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्याचा आनंद घेतला.

पेनसिल्व्हेनिया येथील **सौ. नीलम काणे** या संमेलनाचे पहिले तिकीट खरेदी करणाऱ्या सभासद ठरल्या. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार 👏🏼🙏🏼

🎟️ **BMM २०२६ तिकीट विक्री – चार टप्पे:** बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनासाठी तिकीट विक्रीचे एकूण चार टप्पे निश्चित करण्यात आले आहेत :

१. मकर संक्रांत ते गुढीपाडवा
२. गुढीपाडवा ते महाराष्ट्र दिन
३. महाराष्ट्र दिन ते ४ जुलै (अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन)
४. ४ जुलै ते स्नेहसंमेलन शुभारंभ दिनांक (६ ऑगस्ट)

प्रत्येक पुढील टप्प्यात तिकीट दर वाढत जाणार आहेत. त्यामुळे इच्छुकांनी पहिल्या टप्प्यातील कमी दराचा लाभ घेत, शक्य तितक्या लवकर तिकीटे खरेदी करावीत. यामुळे तुम्हाला मुख्य प्रेक्षागृहात पुढील रांगेत बसण्याची संधी मिळू शकते. तसेच, मित्र-मैत्रिणींबरोबर एकत्र बसण्याची बैठकव्यवस्था हवी असल्यास, तुमच्या शहरातील मराठी मंडळाशी संपर्क साधावा. अन्यथा, स्नेहसंमेलनाच्या अधिकृत संकेतस्थळावरून थेट नोंदणी करता येईल: 👉 https://bmmseattle2026.org/bmm2026

नवीन काय?

🆕 तिकीट विक्री व नोंदणी प्रक्रियेत सिॲटल् संमेलन समितीने काही नवे व उपयुक्त पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. ज्यांना सकाळचा नाश्ता किंवा रात्रीचे जेवण नको असेल, त्यांना ते पर्याय वगळूनही तिकीट खरेदी करता येणार आहे. कृपया आपल्या कुटुंबीयांना व मित्र-मैत्रिणींना तिकीट विक्रीबाबत माहिती देऊन, वेळेत नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करा ही विनंती.

बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनाची नोंदणी प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी आमच्या Registration Team आणि Web Team यांनी तसेच नोंदणी संदर्भात सर्व माहिती प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी Marketing Team ने महत्त्वाची भूमिका बजावली. नोंदणी प्रक्रियेसाठी इतर आवश्यक माहिती संकलित करण्यात काही समित्यांनीही मोलाचे योगदान दिले. या सर्वांच्या समन्वयामुळे आणि सहकार्यामुळे हा प्रवास अधिक सुकर झाला.

जपूया संस्कृती, विणूया नाती

🌟 **कार्यक्रमांची घोषणा** 🌟

🎤 **प्रमुख वक्त्या:**

डॉ. माधुरी कानिटकर - पहिल्या मराठी सेवा-निवृत्त लेफ्टनंट जनरल.

भारतीय सेनेतील सर्वोच्च शिखरांपासून ते विद्यापीठाच्या नेतृत्वापर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार, अनुभव आणि नेतृत्वकथा सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत.

🎭 **मराठी नाटक:** **"कुटुंब किर्तन"** – किरकिर् करणाऱ्या नात्यांवर आधारित कौटुंबिक कॉमेडी

सादरकर्ते: संकर्षण कऱ्हाडे, अमोल कुलकर्णी, तन्वी मुंडले आणि वंदना गुप्ते

BMM स्नेहसंमेलनात भारतातून येणाऱ्या मराठी नाटकाचे चार वर्षांनंतर पुनरागमन होत आहे!

📜 **माय मराठीचा गौरव :** या विभागांतर्गत दोन विशेष कार्यक्रम :

• **गोष्ट इथे संपत नाही – शिवआख्यान**

मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासातील शौर्य, धैर्य आणि चातुर्याचे प्रभावी कथाकथन.

• **मधुरव – बोली ते ब्लॉग -**

प्रमुख कलाकार: मधुरा वेलणकर-साटम

या कार्यक्रमात दृक्-श्राव्य माध्यमातून मराठी भाषेचा इतिहास, साहित्य, सौंदर्य, सामर्थ्य आणि तिची उत्क्रांती अत्यंत रंजक व प्रभावी पद्धतीने उलगडून दाखवण्यात येणार आहे.

🎶 🎤 🎸 **'संगीत रजनी' अंतर्गत:**

- **आरती अंकलीकर-टिकेकर** आणि **रघुनंदन पणशीकर** - शास्त्रीय संगीत व नाट्यसंगीताची सुरेल मैफल.
- **अविनाश–विश्वजीत** आणि **निलेश मोहरीर** - नव्या उमेदीच्या संगीतकारांचा धमाकेदार संगीत सोहळा.
- **मस्तीची मधली सुट्टी** -सादरकर्ते पारितोषिक विजेते, प्रख्यात संगीतकार व गायक **डॉ. सलील कुलकर्णी** खास मुलांसाठी
- **कँडल लाईट कॉन्सर्ट विथ शुभंकर कुलकर्णी** –भाषा बदलतात, पण सूर तोच राहतो. युवा पिढीसाठी खास, ऊर्जेने भरलेला कार्यक्रम!

🎨 **कला-स्पंदन कलादालन:**

आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध व पुरस्कार विजेते चित्रकार **सुचित्रा भोसले** आणि **प्रमोद कुर्लेकर** प्रात्यक्षिके आणि **'कलाकारासोबत संवाद – कॅनव्हासच्या पलीकडून'** या विशेष कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. अधिक माहितीसाठी :

👉 mmseattle2026.org/kalaspandan-artgallery

🌎 **उत्तर अमेरिकेतील निश्चित झालेले कार्यक्रम:**

- **संगीत वस्त्रहरण (राले)** - लोकप्रिय धमाल विनोदी नाटक
- **मोगरा फुलला (लॉस एंजेलिस)** - गो. नी. दांडेकरांच्या साहित्याचे दृक श्राव्य वाचन
- **हसू बाई जोरात (बे एरिया)** - ११ महिलांची स्टॅन्ड-अप कॉमेडी
- **सत्यजित लिमये प्रस्तुत वाद्यसंगम (सिॲटल्)** - २५ वादकांचा ताफा

🏆 **स्पर्धा विभाग:**

उत्तर अमेरिकेतील अनेक गुणी कलाकारांसाठी सुवर्णसंधी – **बीएमएम २०२६ स्वरमंच गायन स्पर्धा.** हा मंच आहे उदयोन्मुख आणि प्रस्थापित गायकांसाठी, समूहांसाठी आणि प्रत्येक वयोगटासाठी!!

मार्गदर्शक आणि परीक्षक: प्रख्यात संगीतकार व गायक **डॉ. सलील कुलकर्णी**

एकल व समूहगीत स्पर्धेसाठी नोंदणी व अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख: **१५ फेब्रुवारी २०२६**

प्रश्नांसाठी:

naprogramsmusic@bmmseattle2026.org

इतर स्पर्धा :

- स्मरणिका कथा व मुखपृष्ठ स्पर्धा
- नांदा हास्य भरे – स्टँडअप कॉमेडी
- नृत्य झंकार – शास्त्रीय व उपशास्त्रीय नृत्य
- नाच ग घुमा, नाच रे पोरा – लोकनृत्य
- चला मंगळागौर खेळूया
- रंग महाराष्ट्राचे – ज्युरीड कला दालन

सर्व स्पर्धांची माहिती: 👉

https:/bmmseattle2026.org/competitions

👧👦 **बालकलाकारांसाठी विशेष कार्यक्रम :**

गुरुवार – Day Zero साठी बालकलाकारांचे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, सर्व स्थानिक मराठी शाळांचा सहभाग असणार आहे. सहभागासाठी त्वरित अर्ज करा :👉 bmmseattle2026.org/baltarang-kishorekunj

आपल्या योगदानातून हे स्नेहसंमेलन अधिक भव्य, समृद्ध आणि संस्मरणीय बनेल. मराठी संस्कृतीच्या या महोत्सवाला आपला हातभार जरूर लावा.

संपर्क : donations@bmmseattle2026.org

🙏 Be a Donor – Support Us

शेवटी, आठवण करायची आहे की बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनाला आता केवळ ७ महिने उरले आहेत. तयारी पूर्ण वेगाने सुरू असून, विविध समित्यांचे स्वयंसेवक निष्ठेने व उत्साहाने कार्यरत आहेत. हे सर्व आपल्या सहकार्यामुळेच शक्य झाले आहे. आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार 🙏

संस्कृती, साहित्य आणि कलेचा आस्वाद घेण्यासाठी तसेच मैत्रीच्या गाठी बांधण्यासाठी ६ ते ९ ऑगस्टदरम्यान सिॲटल् मध्ये प्रत्यक्ष भेटूया!

आपली साथ, आपला सहभाग —

हाच आमचा खरा उत्साह आहे. 🙏🌸

- **अश्विनी क्षीरसागर,** बीएमएम२०२६ समिती



राशिभविष्य : फेब्रुवारी २०२६

" हा महत्वाचा ग्रह गोचर काळ काय सांगतो ते वाचुया. "

अजय तनखीवाले

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

२०२६ सिॲटल अधिवेशन

Frequently Asked Questions (FAQ)

1. When and where is the BMM Convention 2026?

The BMM Convention 2026 will be held in Seattle Convention Center in downtown **Seattle** (USA), from **August 6 to August 9, 2026.**

2. What is Day 0 and when does it take place?

Day 0 is on Thursday, August 6, 2026.

It will feature Continuing Medical Education (CME) and BMM Initiatives like:

Business Conference | **Uttarang** | **Real Estate Conference** | **Educational Meet-ups** | **BMM Shala related programs**

Day 0 requires a separate ticket, except for Donation Package holders, for whom these activities are included.

The ticket price is **$150** for ages 18 and above and $100 for ages 5–17.

3. Is there a banquet dinner on Day 0?

Yes. There will be a Banquet Dinner on Day 0 night, which is a separately ticketed event.

Banquet Dinner ticket price: $150

The Banquet Dinner features a performance by renowned professional artists from India, creating a wonderful setting for meaningful networking among business professionals and fellow attendees.

For all donation packages, the Day 0 banquet dinner is included.

4. When does the main convention begin?

The main convention starts on Friday, August 7, 2026, and continues through Sunday, August 9, 2026.

5. Is there block booking for seating?

No. We have intentionally eliminated block booking.

In past conventions, we received feedback that even early ticket buyers sometimes received seats far back due to block allocations.

To ensure fairness and transparency, seating will now follow a first-come, first-served registration model.

6. How will seating be assigned?

Earlier registrations = better seating

Seating is assigned strictly based on registration timestamp. This ensures fairness to those who book early

7. Is there an early bird discount?

Yes. Early Bird pricing is available.

Booking early gives you two advantages:

Lower ticket price | **Better seating location**

8. How does Mandal-wise registration work?

Each Mandal will receive a separate registration link. Friends using the same Mandal link can book together so they can be seated together

⚠️ **Important:** You must coordinate with your friends before booking.

Example: Person A books at 9:00 AM

Person B books at 3:00 PM using the same Mandal link. If many registrations occur in between, Person B may not be seated next to Person A, as it would be unfair to earlier registrants.

If only a few registrations occur in between, we will do our best to seat them together.

9. Can friends or family from different Mandals sit together?

Yes. This is possible only if one person books tickets on behalf of the others in a single transaction.

10. Is designated seating for all programs?

No. Designated seating applies only to the main auditorium.

For all other programs and venues, seating will be open and based on availability.

11. Can I save money on my ticket by skipping some meals?

Yes. You can reduce your ticket price if you choose to skip breakfast or prefer to go out for dinner with family or friends during the convention.

Please note that this option is not available for lunch, as lunch is included as part of the convention program.

12. How do I book my hotel for the convention?

After completing your BMM 2026 registration, you will receive a hotel booking link.

We are offering discounted hotel rates at Sheraton Grand Seattle, which is:

Located in the heart of downtown Seattle

Adjacent to the Seattle Convention Center

Convenient for all convention activities

13. When will the program schedule and food menu be available?

The program schedule and food menu will be published soon on the convention website. Please stay tuned for updates.

14. Where can I find complete convention details?

For programs, ticket links, food menus, schedules, and updates, please visit:

👉 https://bmmseattle2026.org/

15. What are donation packages and why should I consider them?

Donation packages offer:

Preferred seating | **Additional perks**

Inclusion of select paid events (depending on tier)

For details, please visit:

👉https://bmmseattle2026.org/individual-donor-package-tiers

16. How can businesses sponsor the convention?

If you know a business interested in sponsoring the convention, please direct them to:

👉https://bmmseattle2026.org/corporate-sponsorship-tiers

17. Is there an Expo at the convention?

Yes. The convention will host an Expo, where businesses can showcase their products and services.

Business owners can find more details here:
👉 https://bmmseattle2026.org/expo

18. Whom should I contact for registration-related questions?

For any questions related to registration, please contact: registration@bmmseattle2026.org

19. Is there an option to donate to social causes during registration?

Yes. As we come together to celebrate our language, heritage, and culture, we also remember those in our society who depend on our support. Even a small contribution can make a meaningful difference.

Through BMM's Samajrang initiative, we strive to promote and uphold this spirit of social responsibility.

If you wish, you may choose to donate to one or more Seattle-based organizations of your choice:

Seattle Children's Hospital

Fred Hutch Cancer Center

Sophia Way (supporting homeless women in Seattle)

Please note that this donation is completely optional. You may choose to skip this page, which appears after you complete your convention registration.

20. Is the BMM Convention contributing to social causes?

Yes. As part of our commitment to social responsibility, BMM has decided to donate 10% of the convention profit (if any) to support social causes.

This contribution reflects our belief that celebrating our language, heritage, and culture should also go hand in hand with giving back to society.

21. Are there any discounted tours available before or after the convention?

Yes. Special discounts are available on select pre- and post-convention tours, including:
Alaska Cruise | Seattle & Vancouver tours |
| Nearby regional sightseeing tours |

These tours are offered by our travel partner ClickOn Tours.
For more details, please visit:
👉 bmm.clickontours.com/

22. Where can I learn more about Bruhan Maharashtra Mandal (BMM)?

To learn more about BMM and its initiatives, please visit: 👉 https://bmmonline.org/

भावपूर्ण श्रद्धांजली



कृष्णाजी रामचंद्र उर्फ **दादा दामले** यांचे वयाच्या ९७व्या वर्षी Hillsborough NJ येथे निधन झाले. त्यांनी पुण्यातील सेंट जॉन्स व सेंट व्हिन्सेंट या शाळेत अमराठी विद्यार्थ्यांना मराठी शिकवण्याऱ्या शिक्षकाचे काम अनेक वर्षे केले. पुण्यातील प्रकाशकांचे मराठी प्रूफ तपासनीस म्हणूनही ते काम करीत. पत्नी जयश्री हिचे निधन झाल्यावर १९९४ साली अमेरिकेतील नितीन व राजेंद्र या मुलांजवळ ते स्थायिक झाले. संगणकाचा उपयोग करुन जन्मपत्रिका तयार करण्याचे कौशल्य अमेरिकेत स्थायिक होताच त्यांनी आत्मसात केले. पत्रिकेवरुन व्यक्तीचा स्वभाव विशेष आणि त्याच्या आयुष्यातील भविष्यातील घटनांचा मागोवा ते घेत असत व मार्गदर्शन करीत. बृ. वृत्तात या विषयावर त्यांनी अनेक वर्षे लेखन केले. अमेरिकेत अनेकजण या विषयावर त्यांचा सल्ला घेत असत. ते हाडाचे शिक्षक होते व तरुणांशी संवाद साधत त्यांना प्रोत्साहन देणे हा त्यांचा स्वभाव विशेष होता.

प्रेम, प्रेम म्हणजे ....

उत्तर अमेरिकेतील सर्व साहित्यप्रेमींना सप्रेम नमस्कार.

बृहन्महाराष्ट्र मंडळ आपल्या मातृभाषेचा गोडवा जपण्यासाठी निरंतर कार्यरत असते. तुमच्या शब्दांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा हा आमचा एक प्रामाणिक प्रयत्न.. **BMM आयोजित भव्य काव्यस्पर्धा** -

जर तुम्हाला तुमच्या मनातल्या भावनांना कवितेतून वाट करून देता येत असेल तर ही स्पर्धा खास तुमच्यासाठी आहे आणि स्पर्धेचा विषय आहे **'प्रेम'**

स्पर्धेची रूपरेषा: विषय: **प्रेम** (Love) (प्रेम म्हणजे फक्त रोमँटिक नाही, तर वात्सल्य, निसर्गप्रेम किंवा ईश्वरावरील प्रेमही असू शकते याची कृपया नोंद घ्यावी)

नियम व अटी:

1. **पात्रता:** ही स्पर्धा फक्त उत्तर अमेरिकेतील (USA & Canada) स्पर्धकांसाठी खुली आहे.
2. **वय:** 16 ते 86 वर्षे.
3. **काव्यप्रकार:** मुक्त (छंदबध्द किंवा मुक्तछंद - कवीच्या पसंतीनुसार).
4 **मर्यादा:** जास्तीत जास्त 20 ओळी.
5. **भाषा:** मराठी.
6. **अट:** कविता स्वरचित असावी आणि कोणत्याही मासिकात, सोशल मीडियावर किंवा पुस्तकात प्रकाशित झालेली नसावी (Unpublished).

तुमच्या कवितांचे परीक्षण BMM वृत्ताच्या संपादक मंडळातील सदस्य, कार्यकारिणी सदस्य आणि एक नामवंत कवी/कवयित्री यांच्यामार्फत केले जाईल.

महत्वाच्या तारखा: कविता पाठवण्याची अंतिम तारीख: **28 फेब्रुवारी**
विजेत्यांची नावे आणि त्यांच्या कविता ***1 एप्रिल** *च्या अंकात प्रसिद्ध केली जातील.

बक्षिसे: स्पर्धक संख्येनुसार विजेते घोषित केले जातील. विजेत्यांची निवड हा परीक्षकांचा अंतिम निर्णय असेल याची नोंद घ्यावी .

चला तर मग , प्रेमाचे विविध रंग शब्दांतून मांडायला सुरुवात करा आणि तुमची स्वरचित कविता लवकरात लवकर **vrutta@bmmonline.org** या ईमेल आयडीवर पाठवा . (**Subject line: BMM कविता स्पर्धा 2026**). कविता word doc मध्ये असावी. आपले नाव आणि शहराचे नाव मराठीत लिहिलेले असावे.

आपले नम्र,

संयोजक समिती, बृहन्महाराष्ट्र मंडळ (उत्तर अमेरिका)

मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी संकलन अहवाल

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या “समाजरंग” या उपक्रमांतर्गत, गेल्या वर्षी आपण 'सप्टेंबर २०२५' च्या पुराचा फटका बसलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी “मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी” जमा केला. निधीसंकलनासाठी आम्ही $२५,००० चे लक्ष्य ठरविले होते, आणि आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्या सर्वांच्या प्रेमळ आणि निःस्वार्थ योगदानातून संयुक्तरित्या $६०,००० पेक्षा जास्त निधी जमा झाला!

आम्ही सर्व मंडळांच्या अध्यक्षांचे, बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रतिनिधींचे, तसेच सर्व देणगीदारांचे मनापासून आभार मानतो. ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन, सेव्ह इंडियन फार्मर्स, सेवा इंटरनॅशनल, आणि महाराष्ट्र फाउंडेशन या संस्थांनी पूरग्रस्त भागात मदत उपक्रम सुरू केले आहेत, त्याबद्दल आम्ही या संस्थांच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आणि स्वयंसेवकांचे मनापासून आभार मानतो.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सचिव, **श्री नरेंद्र कल्याणकर** यांनी ३१ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय **श्री देवेंद्रजी फडणवीस** यांची भेट घेतली - त्यावेळी त्यांनी “मराठवाडा पूरग्रस्तांच्या” मदतीसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे **१ लाख** रुपयांचा धनादेश "मुख्यमंत्री सहायता निधीला" देणगी दाखल सुपूर्द केला.

MANAVLOK (Marathwada Navnirman Lokayat) - मानवलोक (मराठवाडा नवनिर्माण लोकायत) या स्वयंसेवी संस्थेने महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील उंदरगाव गावातील गरजू शेतकऱ्यांना पाण्याचे पंप, वायरिंग केबल्स, तसेच इतर आवश्यक साहित्य वितरित केले.

या निधी संकलनासंदर्भात अधिक माहिती मिळवण्यासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या: https://bmmonline.org/samajrang/marathwada_fundraiser/

पेशवाई अभ्यास वर्ग

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून रायगडावर थाटामाटात राज्याभिषेक केला. त्यांच्या निधनानंतर छत्रपती संभाजी महाराज गादीवर आले, मात्र काही वर्षांतच त्यांचा क्रूर वध झाला. त्यानंतर मराठ्यांना त्यांची राजधानी रायगडावरून हलवावी लागली आणि पुढे ऐतिहासिक घडामोडींमधून पेशवाईचा उदय झाला.

पहिले बाजीराव पेशवे यांनी पुण्यात शनिवार वाडा उभारून जवळजवळ चाळीस लढाया जिंकत मराठा साम्राज्याचा विस्तार करायला सुरुवात केली. पुढील पेशव्यांनी “अटकेपार मराठी भगवा झेंडा फडकवला”. पानिपतच्या पराभवानंतरही खचून न जाता मराठ्यांनी अवघ्या दहा वर्षांत दिल्ली जिंकून पुन्हा एकदा “दिल्लीवर मराठी भगवा झेंडा फडकवला”.

अभिमानास्पद अशा या ऐतिहासिक घटनांमधून पेशव्यांविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आणि आपल्या पूर्वजांचे पराक्रम समजून घेण्यासाठी आम्ही तुमच्यासाठी एक नवा व रंजक उपक्रम घेऊन आलो आहोत — “पेशवाई अभ्यास वर्ग”!

या उपक्रमामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जुन्या सहावीच्या पुस्तकातील धड्यांवर आधारित धडे तयार करण्यात आले आहेत. यात पेशव्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित माहिती देण्यात आली असून, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर सोडवता येईल अशी सोपी बहुपर्यायी प्रश्नावलीही उपलब्ध आहे. यात १५० हून अधिक प्रश्न आहेत. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना संगणकावर सोडवता येईल अशी सोपी बहुपर्यायी प्रश्नावली (Multiple Choice Questions – MCQ) देखील उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसोबत पेशवाई विषयी अभ्यास करून त्यांच्याकडून विविध घटनांची माहिती जाणून घ्यावी आणि आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाची “पेशवाई अभ्यास वर्ग” परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र मिळवावे हीच आमची अपेक्षा आहे. इच्छा असल्यास पालक देखील ही परीक्षा देऊ शकतात.

अधिक माहितीसाठी शाळेच्या संकेतस्थळाला भेट द्या: https://bmmonline.org/marathishala/

Project ASHA BMM Fundraiser

महिला सक्षमीकरण निधी संकलन उपक्रम

(Women Empowerment Fundraiser)

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या “समाजरंग” या उपक्रमातर्फे मकर संक्रांत (१४ जानेवारी २०२६) पासून ते आंतरराष्ट्रीय महिला दिन (८ मार्च २०२६) या कालावधीत एका अर्थपूर्ण आणि समाजोपयोगी महिला सक्षमीकरण उपक्रमासाठी निधी संकलन करण्यात येत आहे (Women Empowerment Fundraiser). या उपक्रमाचा मुख्य उद्देश **“ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांमध्ये स्तन-कर्करोगाबाबत जनजागृती वाढवणे आणि या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आशा (ASHA) कार्यकर्त्यांना थेट पाठबळ देणे”** असा आहे.

भारतामध्ये समुदाय आरोग्यसेवेसाठी (Community Health Care) तीन प्रमुख स्तरांवर कार्य करणाऱ्या महिला कार्यकर्त्या आहेत:

- ANM (Auxiliary Nurse-Midwife)
- AWW (Anganwadi Worker)
- ASHA (Accredited Social Health Activist)

यातील "आशा" कार्यकर्त्या ह्या गावातूनच निवडलेल्या, प्रशिक्षित महिला असून त्या गावकरी आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील दुवा म्हणून काम करतात. लसीकरण, मातृ-आरोग्य, क्षयरोग नियंत्रण, जनजागृती आणि आरोग्य सेवा गावातील लोकांपर्यंत पोहोचवणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी आहे. हा उपक्रम भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालया अंतर्गत येतो.

‘आशा’ चित्रपट – एक सामाजिक आरसा: या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे मराठी चित्रपट ‘आशा’. या चित्रपटात “आशा” कार्यकर्त्यांना नायक किंवा पीडितग्रस्त म्हणून न दाखवता, त्यांच्या आयुष्यातील कुटुंब, श्रद्धा, भीती, जबाबदारी आणि धैर्य यांचे वास्तववादी चित्रण करण्यात आले आहे. स्त्रीच्या शरीरस्वातंत्र्याचा, निर्णयक्षमतेचा आणि सक्षमीकरणाचा जागतिक संवाद हा चित्रपट प्रभावीपणे पुढे नेतो.

अमेरिकेतील मराठी समाजाच्या संदर्भात हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता, सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू करणारा ठरतो —जो सहानुभूती वाढवतो, पितृसत्ताक विचारांना प्रश्न विचारतो, स्त्रियांच्या आरोग्य हक्कांबाबत जागरूकता निर्माण करतो आणि महाराष्ट्रातील सामाजिक न्याय चळवळींशी भावनिक नाते अधिक दृढ करतो.

मैना फाउंडेशन आणि निधीचा वापर: बृहन्महाराष्ट्र मंडळ हे उत्तर अमेरिकेतील मंडळांच्या मदतीने हे निधी संकलन करीत असून, जमलेला निधी आम्ही "मैना फाउंडेशन" या संस्थेमार्फत भारतात पाठवणार आहोत. ‘मैना फाउंडेशन’ च्या संस्थापक, सौ. अलका श्रीखडे, ह्या AIIMS नागपूर यांच्या सहकार्याने नागपूर परिसरातील ग्रामीण भागात हा कार्यक्रम राबवण्याची योजना आखत आहेत. आशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांमध्ये स्तन-कर्करोगाविषयी जनजागृती, तपासणीसाठी प्रोत्साहन आणि माहिती पोहोचवण्यासाठी हा निधी थेट वापरण्यात येणार आहे.

आपण काय करू शकता? (Action Items):

- आपल्या मंडळात ‘आशा’ चित्रपटाचे प्रक्षेपण आयोजित करा.
- महिलांसह पुरुषांनाही सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करा.
- मराठी न समजणाऱ्या मित्र-मैत्रिणींनाही आवर्जून आमंत्रित करा.
- निधी संकलन करताना देणग्यांचा थेट उपयोग कसा होणार आहे हे स्पष्टपणे सांगा.

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे हा चित्रपट अत्यंत माफक दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे आणि तो महागड्या चित्रपटगृहात न दाखवता एखाद्या मध्यम आकाराच्या सभागृहात दाखवता येईल.

आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष: या उपक्रमाच्या निमित्ताने चित्रपटाच्या सह-निर्माती सौ.दैवता पाटील यांना ८ मार्च – आंतरराष्ट्रीय महिला दिनी BMMच्या व्यासपीठावर आमंत्रित करण्यात येत आहे. त्या यावर्षी संयुक्त राष्ट्रांच्या ‘Commission on the Status of Women’ अधिवेशनात सहभागी होणार आहेत—ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.

हा उपक्रम म्हणजे कृतज्ञतेतून कृतीकडे जाणारा प्रवास आहे. चला, एकत्र येऊन “आशा” कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहूया आणि ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांसाठी आरोग्य, जागरूकता आणि सक्षमीकरणाचा प्रकाश पसरवूया.

- **प्रसाद पानवळकर,** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

देवभूमी ट्रेल्स : महाराष्ट्राच्या पवित्र वारशाचा सखोल अनुभव

महाराष्ट्राची देवभूमी, तिची मंदिरे, पवित्र नद्यांची उगमस्थाने, ऐतिहासिक वाडे, घाट, आणि जिवंत परंपरा — या सर्वांचा सखोल आणि अभ्यासपूर्ण अनुभव देणारा “Dev-Bhumi Trails – Echoes of the Divine” हा विशेष वारसा-अभ्यास उपक्रम भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट (BORI) आणि बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

हा अभ्यासदौरा **२३ ते २७ फेब्रुवारी २०२६** या कालावधीत पुणे ते पुणे असा असून वाई–मेणावली, महाबळेश्वर–पंचगणी आणि कोल्हापूर परिसर यांचा समावेश आहे. ही केवळ पर्यटन सहल नसून, इतिहास, मंदिरांमधील प्रतिमाशास्त्र (Iconography), भूगोल आणि सांस्कृतिक परंपरा यांचा अभ्यास करणारी; शिकण्यावर आधारित वारसा-अनुभव यात्रा आहे.

या यात्रेमध्ये वाई व मेणावली येथील ऐतिहासिक घाट, नाना फडणवीस वाडा, महागणपती व काशी विश्वेश्वर मंदिरे; महाबळेश्वर येथील स्वयंभू शिवलिंग असलेले महाबळेश्वर मंदिर व कृष्णा नदीचे उगमस्थान असलेले कृष्णाबाई मंदिर; तसेच कोल्हापूर परिसरातील अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर, भवानी मंडप, रंकाळा तलाव, नरसोबाची वाडी आणि खिद्रापूरचे कोपेश्वर मंदिर अशा अनेक महत्त्वाच्या स्थळांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाचे नेतृत्व डॉ. प्रदीप आपटे (Chair – Academics), उत्तरा जाधव (Program Director) आणि इंद्रनील बंकापुरे (Heritage Expert) हे अनुभवी अभ्यासक व तज्ज्ञ करणार असून, त्यांचे संशोधनाधारित मार्गदर्शन या यात्रेचे वैशिष्ट्य ठरेल. लहान गटांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार असल्यामुळे सहभागींसोबत सखोल चर्चा, प्रश्नोत्तर आणि अनुभवांची देवाणघेवाण शक्य होणार आहे.

प्रति सहभागी खर्च $७५०असून त्यामध्ये प्रवास, निवास (Twin Sharing), सर्व जेवण आणि स्थानिक वाहतूक (Innova / Crysta) यांचा समावेश आहे. किमान ८ सहभागी आवश्यक असून, पर्यटनाचा हा हंगाम गर्दीचा असल्याने लवकर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या पवित्र वारशाशी नाते जोडणारा, अभ्यासपूर्ण आणि अर्थपूर्ण असा हा उपक्रम वारसा-प्रेमी सर्व वयोगटांसाठी एक अनोखा अनुभव ठरणार आहे.

अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी:
uttara@boristudyabroad.org
medha.godbole@bmmonline.org
anand.chouthai@bmmonline.org

युध्दस्य कथा ...

युध्दाच्या कथा सांगताना
जोशात —
मध्येच, स्वर त्याचा कातरला
स्मरला असावा कदाचित त्याला
आठवणींच्या समुद्रातला
एखादा खंड बुडलेला
आता जरी असेल त्यावर जमलेला
उदंड पाण्याचा थर, किंचित गोठलेला
तरी कधीकाळी असेल ना
अथांग डोळ्यांसाठी त्यातून
प्रेमाचा झरा वाहिलेला
वा वज्राहुनी कठीण केलेल्या मनातला
एक मऊ कोपरा
कुणाच्यातरी रक्तांश्रुंनी भिजलेला
स्मरला असेल त्याला श्वास
उसासे घेत घेत उसवलेला
अन् आठवला असेल
गोठवणाऱ्या थंडीत शेकोटीमधला
पत्राचा तो शेवटचा कपटा
‘न जळलेला’

\- **शैलेश पोतदार,** डॅलस , टेक्सास

अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख

'अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख' या BMM वृत्तच्या नविन उपक्रमात १६ ते २६ वयाच्या मुलांची मुलाखत घेता येईल, त्यांचे मनोगत, त्यांचे यश, त्यांचे त्यांच्या भविष्याबद्दलचे विचार असे सर्व काही जाणून घेता येईल. या उपक्रमामध्ये पहिली मुलाखत घेण्याचा योग "सायली स्नेहल समीर पाध्ये" हिचा आला. मुलाखतीचे शब्दांकन असे आहे.

प्रश्न: सायली, तू तुझी ओळख कशी करून देशील?

सायली - मी सायली पाध्ये , मी टँपामध्ये राहते आणि स्ट्रॉबेरी क्रेस्ट हायस्कूलमध्ये सीनियर आहे. अभ्यासाबरोबर शाळेतल्या HOSA (एक प्री-हेल्थ क्लब) या क्लबमध्ये इंटरनॅशनल कॉम्पिटिशनमध्ये टॉप टेन मध्ये आले. शाळेच्या ऑर्केस्ट्रामध्ये मी व्हायोलिन वाजवायचे आणि कॉन्सर्टमास्टर होते. नुकतेच नॅशनल मेरिट मध्ये मी semifinalist ला पोहोचले. पण माझी सर्वात आवडती गोष्ट डान्स ही आहे. डान्समध्ये मी कुचीपुडी हा डान्स प्रकार शिकते.

प्रश्न: ही तुझी डान्सची आवड कशी जपतेस ?

सायली - Dance is like my best friend . मी कुचीपुडी डान्स वयाच्या साडेपाच वर्षा पासून श्रीमती माधुरी गुडला यांच्याकडून शिकायला लागले. आता हैद्राबाद इथल्या श्रीमती अनुषा श्रीनिवास यांच्याकडून (Art Academy) डान्स चे online classes घेत आहे. आतापर्यंत मी २ Certificate Exams Distinction मध्ये complete केल्या आहेत. आताच १५ डिसेंबर २०२५ ला Diploma A grade मध्ये पूर्ण केला आहे. यामध्ये practical आणि theory Exam दिल्या आहेत.

प्रश्न: तुला डान्स शिकण्याची प्रेरणा कुणाकडून मिळाली?

सायली - It starts from home. आईमुळेच (स्नेहल पाध्ये) मला डान्सची आवड लागली आणि तिच्या perseverance मुळेच मी आता डान्स करत आहे असे म्हणेन. सुरवातीला सगळेच कठीण वाटायचे. कुचीपुडी डान्स मूळचा आंध्रप्रदेशचा तर त्याची भाषा निराळी, डान्स कसा करायचा त्याची पण भाषा निराळी. आई सगळ्याचेच भाषांतर मराठी आणि English मध्ये करून समजावून सांगायची तर आईच्या push and support मुळेच मी आज डान्स करू शकत आहे.

प्रश्नः हे सगळे करताना तुला आव्हानात्मक असे काय वाटले?

सायली- Any dance form has particular dance postures and mudras. To get them right you need to implement it in your everyday dance practice. So that they become ingrained in your brain. The challenge which I faced is the patience it needs.

When starting at a young age, it is really hard to have that much patience to maintain that discipline. So the first 5 years were crucial. Many times I felt like giving up or felt like I won't be able to do... but then it was my mom who always used to push me, motivate me and in a playful way she used to help me with my riyaaz.

प्रश्न: मग तू डान्स आणि अभ्यासाचा मेळ कसा जमवतेस ?

सायली: Time management मी आई कडून शिकले आणि शिकते आहे. माझे क्लासेस मुख्यत: सकाळी ५ वाजता असतात (मी भारतातुन online classes घेते) आणि त्याच्यानंतर मी शाळेला जाते आणि जेव्हा क्लास नसतो तेव्हा मी माझी प्रॅक्टिस करते. माझी शाळा तशी दूर आहे त्यामुळे शाळेच्या जाण्या-येण्याच्या वेळी car मध्ये नव्या शिकवलेल्या गोष्टी आठवून त्याचा सराव करते.

प्रश्न : तुझा एखादा खास विशेष अनुभव सांगता येईल का?

सायली: अनुभवापेक्षा मी माझे काही inspiring moments share करू इच्छिते. मी अगदी ६-७ वर्षांची होते तेव्हा पं. झाकीर हुसेनजी, पं. जसराजजी यांना भेटण्याचा योग आला. त्यावेळी मी लहान होते. पण त्या वेळी आताच्या वयाची असती तर खूप काही प्रश्न

नक्कीच त्यांना विचारले असते. डान्स मधला अनुभव म्हणजे, मला Diploma च्या practical ला एक assignment होती, त्या साठी मी राधाकृष्णावर आधारीत मराठी गाण्यावर choreography केली होती ती बघून डॉ. कात्यायनी यांनी असाच डान्स करत राहा आणि keep going असा अभिप्राय दिला. हे माझ्या दृष्टीने खूपच महत्वाचे आहे.

प्रश्न : तुझा डान्स बघून, तुझा कार्यक्रम बघून तुला बाकीच्यांच्या कडून कसा प्रतिसाद मिळाला?

सायली: मला सगळ्यांकडून खूप खूप प्रेम मिळाले आहे. सगळ्यांच्या टाळ्या ऐकून अजून खूप काही करण्याची प्रेरणा मिळते.

प्रश्नः पुढच्या काही वर्षात तू तुला कुठे आणि कसे पाहत आहेस?

सायली: पुढे मला Biomedical Science मध्ये career करण्याची इच्छा आहे. तसेच डान्स क्षेत्रात पण अजून बरेच काही शिकायचे आहे. पण मी म्हणेन one step at a time.

प्रश्न : तुझ्याच वयाच्या मुलांना तू काय सांगशील?

सायली: As a friend मी त्यांना म्हणेन की कला काय की sports काय keep it with you like your friend. It becomes your biggest support plus it develops you. It helps you to find your own unique aspect. Everyone should share what they are doing through social media and be in contact with each other to learn from each other.

सायलीचे सगळे विचार, तिची नृत्य कलेबद्दलची आस्था हे सगळे ऐकून भारावल्यासारखे होत आहे. एवढ्या लहान वयातच तिचा आत्मविश्वास आणि संघर्ष यामुळेच तिच्या नृत्य कलेतली आणि शैक्षणिक क्षेत्रातली प्रगती दिसत आहे. तिचा हा सगळाच प्रवास सगळ्यांनाच प्रेरणादायी आहे.

- **शब्दांकन:** **उत्तरा भालेराव**, टॅंपा, फ्लोरिडा

तुमचा उत्कर्ष तुमच्या हातातः भाग २

तुमचा उत्कर्ष तुमच्या हातात भाग १ जानेवारी २०२६ च्या अंकात प्रकाशित करण्यात आला होता.

जीवनात प्रगती म्हणजेच उत्कर्ष (Material Progress) आणि उन्नती (Psychospiritual Progress) कशी साधून घ्यायची याबाबत आपण मागील लेखापासून चर्चा करीत आहोत. या लेखात आपण त्याबाबत थोडे अधिक सविस्तर जाणून घेऊ या.

विश्वप्रार्थना म्हटल्याने माणसाची भौतिक, मानसिक, शारीरिक आणि अध्यात्मिक दृष्टीने प्रगती होते. माणसाने जीवनात सर्वार्थाने आणि सर्वांगाने प्रगती साधण्यासाठी सातत्याने 'विश्वकल्याणकारी विश्वप्रार्थना' म्हणायला हवी. विश्वप्रार्थना ही सुंदर, सकारात्मक, सहकारात्मक आणि व्यापक विचारांची खाण आहे. विश्वप्रार्थनेमुळे विश्वातील सर्व चांगल्या गोष्टी तुमच्याजवळ आकर्षित होत जातात. असे असले तरी विश्वप्रार्थना म्हणायला सुरुवात केल्यावर लगेच चांगले अनुभव येतात असे नाही. बऱ्याचदा विश्वप्रार्थना म्हणतानाही मनात नकारात्मक विचार येतात. विश्वप्रार्थना म्हणताना मन एकाग्र होत नाही. मन एकाग्र न झाल्याने काही लोकांना असे वाटते की, विश्वप्रार्थना म्हटल्याचा आपल्याला काही विशेष लाभ होणार नाही. प्रार्थना म्हणताना मन एकाग्र होत नाही याचे मुख्य कारण माणसाचे मन सतत भूतकाळाचे चिंतन आणि भविष्यकाळाची चिंता करीत असते. भूतकाळाचे अनिष्ट चिंतन आणि भविष्यकाळाचा अतिविचार केल्यानेच माणूस नैराश्य आणि उदासिनतेच्या अधीन जातो.

विश्वप्रार्थना करताना जर तुमच्या मनात नकारात्मक विचार येत असतील तर चिंता करण्याचे कारण नाही. चंचलत्व हा मनाचा स्वभाव आहे. त्यामुळे प्रार्थना म्हणताना मनाला जबरदस्तीने एकाग्र करणे फायद्याचे ठरणार नाही. उलट मन जितके एकाग्र करण्याचा प्रयत्न कराल तितके मन अधिक अस्थिर होत जाईल. यासाठीच मनात सर्व प्रकारचे विचार येणार असे गृहीत धरुनच प्रार्थना करण्याचा अभ्यास सुरु करा. मन एकाग्र करण्याचा तुम्ही जितका प्रयत्न करता तितके तुमच्या मनात अधिक नकारात्मक विचार येतात. विशेष म्हणजे तुमच्या मनात एरव्ही जे नकारात्मक विचार येत नाहीत ते सुद्धा अशा वेळी आवर्जून मनात घुसतात. विश्वप्रार्थना करताना जरी तुमचे मन एकाग्र झाले नाही तरी विश्वप्रार्थनेचा फायदा तुम्हाला अवश्य मिळणार

आहे. याचे मुख्य कारण असे की सतत विश्वप्रार्थना म्हणून तुम्ही तुमच्या अंर्तमन रुपी कंप्युटरला चांगल्या विचारांचे फिडींग करीत आहात. तुम्ही अंर्तमनाला जसे फिडींग करणार तसाच परिणाम तुम्हाला तुमच्या आयुष्यात मिळणार आहे. त्यामुळे विश्वप्रार्थनेचा सकारात्मक परिणाम मिळणे हे निसर्गनियमानुसार अपरिहार्य आहे. त्यामुळे उगाच मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करीत बसू नका. मनात येणाऱ्या नकारात्मक विचारांना बांध घालण्याचाही प्रयत्न करु नका. तुम्ही फक्त तुमच्या मुखात सतत विश्वप्रार्थना कशी राहील याची काळजी घ्या.

एक उदाहरण देऊन स्पष्ट करतो. कागद वाऱ्याने उडून जाऊ नये यासाठी आपण कागदावर पेपरवेट ठेवतो. पेपरवेट ठेवल्यानंतर कागद वाऱ्याने फडफडत नाही असे नाही. मात्र कितीही जोरदार वारा असला तरी कागद पेपरवेटमुळे उडून जात नाही. तसेच विश्वप्रार्थनेचा पेपरवेट मनावर ठेवला की मन जरी इकडे-तिकडे गेले तरी भरकटत नाही. इंग्रजीमध्येही एक म्हण आहे की, “Take care of the pence, and pounds will take care of themselves” त्याचप्रमाणे तुम्ही फक्त विश्वप्रार्थना प्रयत्नपूर्वक, अट्टाहासाने आणि सतत तुमच्या मुखात राहील याची काळजी घ्या. रिकामपणी सतत विश्वप्रार्थना म्हटल्याने यथावकाश तुमच्या मनातील सर्व वादळे आपोआप शांत होत जातील. तुम्हाला विश्वप्रार्थना करण्याची गोडी लागेल आणि तुमचे मन स्थिर होईल. मनःशांती मिळविण्याचा हा एक सोपा मार्ग आहे.

इथे आणखी एक गोष्ट लक्षात ठेवायची ती अशी की, विश्वप्रार्थना कशीही म्हणून फळ मिळत असले तरी आयुष्यभर जमेल तशी प्रार्थना म्हणत बसणे योग्य नाही. प्रार्थना म्हणणे प्रत्येकाला सोपे जावे यासाठी सुरुवातीला सदगुरु “जमेल तशी प्रार्थना म्हणा” असे सांगतात. काही दिवस मन शांत होईपर्यंत अशी प्रार्थना म्हणणे योग्य आहे. प्रार्थना म्हणण्यात पुढे तुमची जस-जशी प्रगती होत जाईल तस-तशी मात्र प्रार्थना प्रयत्नपूर्वक, अट्टाहासाने आणि सातत्याने म्हणायला हवी. कारण प्रार्थना म्हणण्यासाठी भरपूर प्रयत्न करावे लागतात. मनाला पुन्हा पुन्हा प्रार्थनेच्या विचारावर आणण्यासाठी भरपूर अट्टाहास लागतो. मन चंचल असल्यामुळे ते प्रार्थनेपासून सहज दूर जाते. त्याला पुन्हा पुन्हा प्रार्थना म्हणण्याची आठवण करावी लागते. मन चंचल असले तरी त्याचा आणखी एक चांगला स्वभाव आहे तो म्हणजे ते काही काळाने पुन्हा पूर्वपदावर येते. मनाला पूर्वपदावर आणण्यासाठी जे प्रयत्न करावे लागतात त्यालाच ‘अट्टाहास’ म्हणतात. प्रार्थना म्हणण्यासाठी तुम्ही करीत असलेल्या प्रयत्नांमध्ये अट्टाहास आणि सातत्य हवे. या दोन गोष्टी नित्यनेमाने करणे म्हणजेच प्रार्थनेचा अभ्यास करणे. प्रयत्न करताना ‘Consistency is a key’ हे नेहमी लक्षात ठेवायचे. याचाच अर्थ प्रार्थना दररोज,सातत्याने म्हणण्याचा प्रयत्न करायचा. तुम्ही जेव्हा सातत्याने प्रार्थना म्हणता तेव्हा तुमच्या अंर्तमनाला प्रार्थनेचे फिडींग आपोआप होत जाते. ज्यामुळे भविष्यात तुम्हाला प्रार्थनेचे चांगले फायदे मिळतात.

विश्वप्रार्थनेतील शब्द आणि भावनेला खूप महत्व आहे. कारण जसे शब्द तुमच्या अंर्तमनात जातात तशाच प्रकारच्या कल्पना आणि भावना अंर्तमनात निर्माण होत असतात. विश्वप्रार्थना म्हणताना शब्दानुसार कल्पना आणि भावनेची जोड दिली की तुम्हाला लवकर चांगले फळ मिळू शकते. कारण विचार आणि विकार हे बर्हिमनात निर्माण होत असतात तर कल्पना आणि भावना हे अंर्तमनाचे प्रगटीकरण असतात. त्यामुळे तुम्ही जितकी मनापासून प्रार्थना म्हणाल तितके सकारात्मक विचारांचे व्हायब्रेशन तुमच्या अंर्तमनात निर्माण होतात. या व्हायब्रेशनमुळे तुम्हाला प्रंपचातील भौतिक फायदे तर मिळतातच शिवाय तुमच्या मनाचे उन्नयन देखील होत जाते. तुम्ही तुमच्या मनाला प्रार्थनेचे जस-जसे फिडींग करु लागता तस-तसा भाव तुमच्या मनात निर्माण होत जातो. विश्वप्रार्थना नियमित म्हटल्यामुळे तुमचे सर्वार्थाने, सर्वांगाने भले आणि कल्याण होते. विश्वप्रार्थनेत सदगुरुंनी भले हा शब्द प्रंपचाच्या अंगाने प्रगती आणि कल्याण हा शब्द परमार्थाच्या अंगाने प्रगती यासाठी वापरला आहे. म्हणूनच प्रार्थनेमध्ये ऐश्वर्य आणि ईश्वर दोन्हीची प्राप्ती करुन देण्याचे सामर्थ्य आहे.

“प्रार्थना हे प्रथम शब्द असतात. हळूहळू तसा भाव होतो. हा भाव जेव्हा स्वमध्ये मुरतो, तेव्हा तो स्वभाव होतो. नंतर तशी वृत्ती आणि वृत्तीतून कृती निर्माण होते. अशा कृतीतून तुमची स्वप्नपूर्ती होते.”

कधी कधी मात्र काही गोष्टी मिळायला थोडा वेळ लागू शकतो. सहज सोप्या गोष्टी पटकन मिळतात तर कठीण गोष्टी मिळायला थोडासा वेळ लागतो. कारण मनात भाव निर्माण व्हायलाही थोडा वेळ लागतो. विश्वप्रार्थना म्हणता म्हणता ‘सर्वांना सर्व काही मिळू दे’ हा भाव मनात निर्माण होऊ लागतो. विश्वप्रार्थनेतील हा भाव तुमच्या जीवनात सर्व अशक्य गोष्टीही शक्य करु लागतो. यासाठीच प्रार्थना आणि भाव याचे एकत्र फिडींग मनाला व्हायला हवे. भावात प्रार्थना म्हटली की तुम्हाला त्याचे चांगले परिणाम लवकर दिसू लागतात.

थोडक्यात विश्वप्रार्थनेतील भाव खूप महत्त्वाचा आहे. मनात भाव निर्माण होण्यासाठी विश्वप्रार्थनेचे अनुभव यायला हवे. तुमच्या जीवनातील लहान-सहान समस्या सहज सुटू लागल्या की तुम्हाला प्रार्थनेची गोडी वाटू लागेल. प्रार्थनेची गोडी वाटणे अत्यंत गरजेचे आहे. आज गोडी नसल्यामुळे विश्वप्रार्थना म्हणण्याचा अट्टाहास आणि सातत्य राखले जात नाही. एकदा तुम्हाला प्रार्थनेची गोडी लागली की सातत्य आणि अट्टाहासाने प्रार्थना तुमच्याकडून म्हटली जाईल. लक्षात ठेवा! कोणतीही गोष्ट एका दिवसात घडत नाही. त्यामुळे सुरुवातीला त्यासाठी थोडा वेळ लागेल. विश्वप्रार्थनेला तुम्ही एकदा धरले की विश्वप्रार्थना तुमच्या जिभेला आणि पर्यायाने तुमच्या मनाला धरेल. यासाठीच सद्गुरु सुरुवातीला "कशीही प्रार्थना म्हणा!" असे सांगतात. कारण एकदा तुमच्या जिभेला प्रार्थनेचे वळण लागले की तुमच्या मनाला शुभचिंतनाचे वळण लागते आणि त्यामुळे आपोआप तुमच्या जीवनाला चांगले वळण लागेल.

- श्री. प्रल्हाद वामनराव पै, आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

संकल्पना : गौतम पंगू   रेखाटन: शीतल रांगणेकर

शनिवार वाडा ते गेटवे ऑफ इंडिया

मुंबईत जन्मलेला २३ वर्षीय धावपटू **विवेक धांडे** याने पुण्यातील ऐतिहासिक शनिवार वाडा ते मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया असा तब्बल १७६ किलोमीटरचा धावप्रवास तीन दिवसांत पूर्ण केला. ही धाव केवळ क्रीडात्मक कामगिरी न राहता महाराष्ट्राच्या भौगोलिक-सांस्कृतिक परिसरातून आणि स्वतःच्या आयुष्यातील प्रवासातून केलेली एक भावनिक वाटचाल ठरली.

धावेला सुरुवात आणि शेवट जाणीवपूर्वक निवडल्याचे विवेकने सांगितले. शनिवार वाडा हा पुण्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे, तर गेटवे ऑफ इंडिया हे त्याच्या जन्मनगरी मुंबईचे अविभाज्य चिन्ह असल्याचे त्याने नमूद केले.



ही धाव तीन टप्प्यांत पार पडली. पहिल्या दिवशी विवेकने पुणे ते लोणावळा असा ६९.४६ किमीचा पल्ला १० तास ५२ मिनिटांत पूर्ण केला. दुसऱ्या दिवशी लोणावळा ते नवी मुंबई असा ६३.३७ किमीचा टप्पा त्याने ११ तास २४ मिनिटांत गाठला. तिसऱ्या व शेवटच्या दिवशी नवी मुंबई ते मुंबई असा उर्वरित ४३.२७ किमीचा प्रवास ८ तास ९ मिनिटांत पूर्ण करत त्याने गेटवे ऑफ इंडिया येथे धाव समाप्त केली.

या संपूर्ण मार्गावर पुण्यातील संभाजी पूल, लोणावळ्याचे घाट, जुना वाशी पूल, सीएसटी रेल्वे स्थानक, मरीन ड्राइव्ह आणि नरिमन पॉइंट यांसारखी महत्त्वाची ठिकाणे त्याच्या वाटेत आली. परावर्तक (रिफ्लेक्टिव्ह) धावण्याचे साहित्य परिधान करून धावत असताना अनेक नागरिकांनी त्याला थांबवून 'कुठे चाललात?' अशी विचारणा केल्याचेही त्याने सांगितले.

अनुभव सांगताना विवेक म्हणाला की, नवी मुंबईतील उभारणी सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील शांत वातावरण आणि मुंबईतील गजबजलेल्या वाहतुकीतील धावपळ

यातील फरक प्रकर्षाने जाणवला. “शांत भागातून अचानक गर्दीत शिरणे हेच या प्रवासाचे खास आकर्षण ठरले,” असे तो म्हणाला.

विवेकची धावण्याची आवड बालपणापासूनच सुरू झाली. अमेरिकेत शालेय शिक्षण घेत असताना त्याने क्रॉस-कंट्री स्पर्धांमध्ये सहभाग घेतला, तर कॅनडातील पदवी शिक्षण काळात ही आवड अधिक दृढ झाली. यावर्षी त्याने इटलीतील मिलान ते कियासो अशी ६२.१३ किमीची धाव पूर्ण केली, तसेच कॅनडाच्या रॉकी पर्वतरांगांमध्ये ११० किमीची सहा दिवसांची पदभ्रमंती केली. या अनुभवांनीच पुणे-मुंबई अल्ट्रा धावेसाठीची त्याची तयारी घडवली, असे तो सांगतो.

सध्या कॅलिफोर्नियातील युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सांता बार्बरा येथे भौतिकशास्त्रातील पीएचडी करत असलेल्या विवेकच्या मते, सहनशक्तीच्या आव्हानात शारीरिक क्षमतेपेक्षा मानसिक ताकद अधिक महत्त्वाची ठरते. आपल्या आजीचे वाक्य आठवत तो सांगतो, “थेंबे थेंबे तळे साचे.” संपूर्ण अंतराचा विचार न करता एकावेळी एक किलोमीटर पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करणे, हाच या यशाचा खरा मंत्र असल्याचे त्याने नमूद केले.

- **प्रिया धांडे,** कॅलगरी, कॅनडा

बाकडे....

बसून ह्या बाकड्यावर
ऐकावी स्वतःची धून
निवांतपणा मिळावा आणि
त्यात रमावे अधून मधून....

फुलांचे सानिध्य फुलांचा सुवास
फुलांचा सुंदर रंग
गप्पा मारत फुलांशी
व्हावे त्यातच दंग....

फुल, बाकडे आणि मी
जमावी मस्त गट्टी
नसावा थारा वादाला
सदैव असावी बट्टी !!!!

- **अंकिता कार्ले,** हार्टफोर्ड, कनेक्टिकट

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

माझा (नेहमीचाच) प्रवास

मी गेल्या वर्षी दोनदा भारतात जाऊन आले. खरं म्हणजे आपल्या सगळ्यांसाठी हा नेहमीचाच प्रवास ! पण या वेळच्या प्रवासात काही (सामान्य आणि परत परत येणारे) अनुभव मनावर कोरले गेले. ह्या अनुभवांचा जो खजिना माझ्याजवळ जमला तो तुमच्याबरोबर मला वाटून घ्यावासा वाटतोय, म्हणून ह्या लेखाचा खटाटोप !

जेव्हा हा लेख लिहायला घेतला तेव्हा अनेक विचारांची गर्दी माझ्या मनात जमली. असं वाटलं की ह्या लेखाचं नाव आणि त्यातील मजकूर खालील पैकी काहीही असू शकतो – माझी भारताची ट्रिप म्हणजे अगदी आपण चौथी-पाचवीत बाळबोध निबंध लिहत असू त्यासारखा निबंध किंवा ‘कोथरुडमधले खड्डे’ हा जळजळीत टिका करणारा लेख किंवा ‘मायक्रोबायोलॉजी ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टिनल पॅथोजेन्स असोशिएटेड विथ ईच रेस्टॉरंट इन खाऊगल्ली’ असा संशोधनात्मक असू शकतो, किंवा अमेरिकन दृष्टीकोनातून सर्वात महत्त्वाचा म्हणजे शॉपिंग इन इंडिया : अ स्पिरिचुअल एक्सपीरियंस असा प्युअरली कन्सुमेरिझमवर आधारित असा असू शकतो. पण असो. मी केवळ भारतातील प्रवासाच्या टप्प्यावरच लक्ष केंद्रित करायचं ठरवलं. नाही तरी भारत सोडून बाकीच्या जगात टेक्नोलॉजी, मर्यादित लोकसंख्या इत्यादीमुळे प्रवास केव्हढा सपक झालाय. भारतात अजूनही पावलोपावली, काही अंशी तरी अनिश्चितता असल्यामुळे इष्ट ठिकाणी सुखरुप पोचल्याची गोडी काही वेगळीच असते.

तर राजेहो, माझे फीनिक्सहून निघालेले विमान मुंबईला उतरले. पिंजऱ्यात कोंडलेल्या कोंबड्यांसारखे सर्व प्रवासी विमानातून बाहेर पडले. बरेच अंतर भरभर एका दिशेने एकाग्रतेने चालल्यानंतर माझ्या प्रिय लगेजचे आणि माझे मधुर मिलन झाले...तो सोहळा अवर्णनीय होता...कारण मी माझ्या काळ्या सुटकेसला कुठलेही ओळख चिन्हं लावलेले नव्हते. (काय हा आत्मविश्वास आपण एकमेवाद्वितीयम् असल्याचा...म्हणजे घरातून निघताना तरी तसे वाटत होते !) बॅगेज क्लेममध्ये पोचल्यावर लक्षात आले की आपल्यासारखेच दिसणारे आणि आपल्यासारखेच लगेज असणारे शंभर लोक तिथे उपस्थित आहेत. त्यामुळे प्रत्येक काळी बॅग दिसली की आली, आली, आली आणि दुसरंच कुणी ती घेताना दिसलं की गेली, गेली, गेली...असा बरेचदा झालं. बरं, कॅरसेल म्हणजे मेरी गो राउंड -ज्याच्यात मेरी म्हणण्यासारखं काहीच नसतं- हा म्हणजे अतिशय करमणुकीचा डोंबाऱ्याचा खेळ आहे आणि तो पाहणे म्हणजे आपल्या जीवनाची इति कर्तव्यता आहे अश्या आवेशाने मेरीच्या, आय

मीन, गो राउंडच्या जास्तीत जास्त जवळ उभे राहण्याचा लोक प्रयत्न करत होते.

माझ्या मागून एक धिप्पाड बाई आली आणि ‘हटो जरा’ असं गुर्मित म्हणत मला बाजुला सारून सहज पुढे गेली. तिचं नाव गुरमित असल्याचं पुढच्या काही मिनिटातच कळलं. काही क्षणात सुरजीत सुर मारून पुढे आला तेव्हा माझ्यासारखीच दुसरी व्यक्ती मागे सरकली- फक्त तिचे केस आणि डोळे सुंदर होते. ती आणि मी एकमेकींकडे पाहून केविलवाणं हसलो. आणि त्याक्षणी मला साक्षात्कार झाला की महाराष्ट्र आणि बंगाल कसे निर्माण झाले ते ! गुरमितने ‘हटो जरा’ म्हटल्यामुळे ! नाही तर हिंदुस्थान काश्मीर ते कन्याकुमारी असाच समजला जातो, नाही का? सीतेवर लक्ष ठेवण्याची अशोक वनातील ड्यूटी संपल्यामुळे कन्याकुमारीतील लोकांची आमच्यामागे एक पूर्ण फळी उभी होती...

सेल फोनवर अगम्य भाषेत बोलत. त्यांच्यामुळे भारताचा नकाशा तिथे पूर्ण झाला. त्यानंतर मी म्हणजे मीच आहे आणि मी कुठलाही गुन्हा करण्याच्या लायकीची नाही, याची खात्री झाल्यावर मला भारताच्या रस्त्यावर सोडण्यात आले.

एअरपोर्टच्या बाहेर आल्यावर मी म्हणजे मीच आहे आणि माझी कुठलाही गुन्हा करण्याची लायकी नाही, याचे मला वाईट वाटले. तसेच पंचेंद्रियांपैकी माझं कर्णेंद्रियच फक्त जागृत आहे, असे माझ्या लक्षात आले. बाकीची इंद्रिये घाबरून लपून बसली होती. त्या प्रचंड आवाजाच्या शॉकने त्या क्षणी मला तिखटातला तिखट किंवा गोडातला गोड पदार्थ जरी खायला दिला असता ना, तरी त्याची चव मला लागली नसती. चिमटा काढला असता, तर तो जाणवला नसता, नाकाखाली हिंग धरला असता तरी कळले नसते. डोळे उघडे होते आणि ते दर टप्प्याला जास्त उघडत होते; पण डोळ्यांनी सुद्धा आपण ऐकतो आहोत, असे वाटत होते. त्यामुळे माझ्या फोनची नाजूक रिंग मला ऐकू आली नाही. खरं म्हणजे सेल फोनमध्ये जोरदार चिमटा घेण्याचीसुद्धा सोय हवी, असा एक मिलियन डॉलर विचार नंतर माझ्या मनात, ओंजळीत क्षणभर मीन यावा, (आरती प्रभूंनी सांगितल्याप्रमाणे) तसा चमकून गेला. थोडे भानावर आल्यावर लक्षात आले की आपल्याजवळ एक जादूची वस्तू आहे, ती म्हणजे आपला सेल फोन ! खरं म्हणजे तो सोल-फोनच ! चांदोबातील गोष्टींमध्ये अरण्यातून जाणाऱ्या राजपुत्राला जादूची कांडी किंवा तत्सम वस्तू दिली असते ना, तसेच काहीसे !

सेलफोनकडे पाहिले तर अनेक मिस्ड कॉल्स, मेसेजेस...(या क्षणी, लोक हो, डोक्यावर हात मारणाऱ्या इमोजीची आठवण करा.) शेवटी अमृतमय असे मराठी शब्द त्या जादुई यंत्रातून बाहेर पडले, ‘ताई, कुठसा उभ्या हायती तुम्ही? मी गोठा नंबर पाचमध्ये बैल लावले हायत’. (मला तसे ऐकू आले किंवा AI ने मध्ये नाक खुपसून ते भाषांतरीत केले असावे.)

मग मी पार्किंग गराज (गॅरेज !) नंबर पाच कुठे असेल याचा शोध घेऊ लागले. ‘अॅलिस इन वंडरलँड’ मधल्या चेशायर कॅटसारखं हसत अनेकांनी परस्पर विरोधी दिशांकडे अंगुलिनिर्देश केले. शेवटी ‘महाजनो येन गतस्य पंथ:’ हे आपल्या पूर्वजांनी शिकवलेले वचन आठवून लोकांचा ओघ जिकडे चालला होता तिकडे गेले. या उक्तीचा अर्थ ‘गो विथ द फ्लो’ असा आहे, हे मला काही क्षणातच कळले. त्या फ्लो मधील अनेक बिंदूंपैकी आपणही केवळ एक अतिक्षुद्र असा बिंदू आहोत, याची प्रकर्षाने जाणीव झाली आणि हिंदुस्थान ऐवजी बिंदुस्थान हे नाव आपल्या देशाला योग्य ठरेल, असे वाटले.

एलिव्हेटरमध्ये ठासून भरलेल्या अनेक बिंदूंबरोबर आपल्या आयुष्यातील काही जागृतावस्थेतील मोलाचे क्षण आपल्याला घालवायचे आहेत, ह्या अग्निदिव्याची पूर्ण कल्पना येतपर्यंत माझ्या शरीराचं पूर्ण नाक झालं होतं. आता मला कानातून सुद्धा वास येऊ लागले. आणि त्या तीन मिनटाच्या प्रवासानंतर माझं शरीर द्विमितीय म्हणजे टू डायमेनशनल झालं होतं. बाहेर आल्यानंतर मियांव-मू, मियांव-मू (कॅट -काऊ योगासन) असं करुन शरीरात हवा भरली. ते पाहून लोकांची कुत्री भुंकायला लागली. हत्ती चालताना कुत्री भुंकतातच, असे म्हणून तिकडे मी दुर्लक्ष केले. आणि आपण कशी फिनीक्समध्येच असताना टॅक्सी बुक करुन ठेवली, या विषयी स्वतःची पाठ थोपटली.

केके टॅक्सीने पाठवलेल्या मेसेजप्रमाणे कारचं नाव होतं डिझायर आणि ड्रायव्हरचं नाव होतं मार्लिन ब्रँडो. जस्ट कीडिंग ! ड्रायव्हरचं नाव होतं-विष्णू. ड्रायव्हरच्या रुपात माझ्यासमोर अवतरलेला-विष्णू ! शेषशायी भगवान विष्णू आणि त्याचे पाय चुरणारी लक्ष्मी यांचं चित्र गाडीतल्या आरशाला लटकलं होतं. मी ड्रायव्हरला म्हटलं “स्वतःचा फोटो लावून फिरता वाटत तुम्ही ?” तो हसत म्हणाला, “पण मी माझ्या लक्ष्मीचे पाय चुरतो.” हा समाजात झालेला सुखावह बदल आनंदाने स्वीकारत आमची गाडी एकदाची त्या गोठ्याच्या, म्हणजे गराजच्या बाहेर निघाली. रस्त्यावर लागणाऱ्या प्रत्येक गचक्याला ड्रायव्हरचं नाव घेतल्यामुळे इष्ट स्थळी पोचेपर्यंत विष्णूसहस्रनामाचा जप कधीच पूर्ण झाला. ह्या पुण्याच्या प्रभावामुळे माझी अमेरिकन चकाकी धुतली जाऊन कोथरुडला पोचेपर्यंत माझा बिंदू पुण्याच्या सिंधूमध्ये सहज मिसळून गेला.

- **भाग्यश्री बारलिंगे**, मेसा, ॲरिझोना

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

कॅलिफोर्नियातील महाराष्ट्रीयन उपहारगृहांचा (रेस्टॉरंटसचा) इतिहास

उपहारगृहांच्या व्यवसायात प्रामुख्याने पंजाबी आणि साऊथ इंडियन मंडळी संपूर्ण जगात चांगली प्रसिद्ध आहेत. परंतु मराठी उपहारगृहे फार तुरळक आढळून येतात. याचं माझ्यामते मुख्य कारण म्हणजे या धंद्याचा व्याप, जबाबदारी, वचनबद्धता, मनुष्यबळ आणि नोकरवर्गाला हाताळण्याचे कौशल्य असू शकेल.

माझ्या माहितीनुसार, माझे बंधू सुरेश तेंडुलकर आणि मंदावाहिनी यांनी सर्वप्रथम १९८७ साली लॉस एंजेलिस जवळील ग्लेन्डेल या उपनगरात सर्व प्रथम 'टेस्ट ऑफ इंडिया' नावाने एक फास्ट फूड रेस्टॉरंट सुरु केले. साधारण ८ महिन्यांनी त्यांच्या उपाहारगृहासमोरच रस्त्याचे खोदकाम सुरु झाले आणि ते बरेच महिने चालू होते, त्यामुळे गिऱ्हाईकाना येण्याचा मार्गच बंद झाला, व शेवटी त्यांना ते उपहारगृह बंद करायला लागले. तत्पूर्वी त्यांनी १९८४ साली जेव्हां लॉस एंजेलिसला ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या त्यात त्यांनी एक फूडस्टॉल टाकला होता.

दोन अनुभवानंतर १९८८ साली दादा ज्या कंपनीत काम करत होता त्या कंपनीने सर्वांना ले-ऑफ दिला त्यातून आलेल्या पैशात त्याने व त्याच्या बरोबरच्या तीन गुजराथी इंजिनीअर्सनी मिळून लॉस एंजेलिस जवळील Anaheim येथे अगदी मोक्याच्या ठिकाणी मोठे उपहारगृह विकत घेतले. एका भागीदाराची बायको ब्राझीलची असल्याने त्याचे नाव 'Rio's Café' असं ठेवलं. त्यात Banquet room., बिअर बार Salad bar असं सर्व होतं. दुर्दैवाने वर्षभरातच या उपाहारगृहासमोर देखील रस्त्याचे काम सुरु झालं आणि त्याच बरोबर इतर काही कारणांमुळे उपहारगृह विकायला लागलं. या सर्व प्रयत्नांनंतर त्याने आणि वहिनीने या धंद्याचा विचार सोडून दिला.

त्यानंतर १९९० च्या उत्तरार्धात लॉस एंजलिसच्या उत्तरेला सॅन फ़ेर्नांडो व्हॅली येथे सौ. भारती घोलकर यांनी 'अन्नपूर्णा'' नावाने मराठी पदार्थांचे उपहारगृह सुरु केले. त्याआधी त्या कॅटरिंगही करत असत. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सिएटल येथे झालेल्या अधिवेशनाचे कॅटरिंगचे कॉन्ट्रॅक्ट देखील त्यांनी घेतले होते. काही वर्षांपूर्वी त्यांनी ते रेस्टोरन्ट बंद केले.

२००५ मध्ये लॉस एंजलिस जवळील Cerritos/Artesia मधील Little India म्हणून ओळखलेल्या जाणाऱ्या विभागात स्मिता वसंत यांनी 'Saffron Spot' नावाने खास भारतीय आईस्क्रीमचे दुकान सुरु केले, त्याचे वैशिष्ठ्य म्हणजे त्या स्वत: आंबा, पिस्ता, गुलाब, लिची वगैरे फळांचे स्वादिष्ट आईस्क्रीम बनवतात. Saffron Spot चे आईस्क्रीम खास करून लग्न समारंभाला आणि हॉटेल्सनाही ऑर्डरप्रमाणे पुरवलं जातं. नंतर काही वर्षांनी त्यांनी वडा-पाव आणि त्याबरोबर झणझणीत लसूण चटणी आणि मुंबई चटणी सँडविच द्यायचे चालू केले. वडा-पाव बरोबर स्पेशल मसाला चायची लज्जत तर औरच. त्याशिवाय आलं लिंबू घातलेला उसाचा ताजा रसही मिळतो.

उत्तर अमेरिकेतील बे एरियामध्ये मिलपिटास या शहरात २०१४ साली हर्ष, हेमांगी गोठोस्कर आणि मीनाक्षी, मिलिंद देसाई या कुटुंबियांनी 'अन्नपूर्णा' उपहारगृह सुरु केले. हर्ष यांच्या प्रबळ इच्छेमुळे हे उपहारगृह सुरू झाले, त्या वेळी बे एरियात मराठी पदार्थांचे एकही उपहारगृह नव्हते. अन्नपूर्णाचे वैशिष्ठ्य म्हणजे थालीपीठ, साबुदाणा वडा, कोथिंबीरवडी, झुणका आणि ठेचा भाकरी, पुरणपोळीसारख्या अस्सल मराठी पदार्थांची घरगुती लज्जत. भारतातून मराठी नाटकांचे, व इतर कार्यक्रमांचे कलाकार बे एरियात आल्यावर अन्नपूर्णाला नक्कीच भेट देऊन जातात आणि अगदी तृप्त मनाने भरभरून कौतुक करून जातात. येथील मराठी पदार्थांची चटक आता महाराशियनांशिवाय इतर भारतीयांनाही लागली आहे. दुसरं वैशिष्ठ्य म्हणजे अन्नपूर्णामधील मालकच नव्हे तर तेथील वेटर्स देखील अतिशय आदराने, अदबीने गिऱ्हाईकांशी वागतात, त्यामुळे गिऱ्हाईकांनाही परत यावंसं वाटत. अन्नपूर्णा शेजारीच त्यांचे आणखी एक Asian Bowl नावाचे वेगळ्या Asian पदार्थांचे रेस्टॉरंट आहे.

२०१८ मध्ये बे एरियातील समीर पाटील आणि तुषार कोठळकर या दोन मित्रांनी सनीव्हेल येथे 'बॉम्बे टू गोवा' नावाचे शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांचे उपहारगृह सुरु केले होते. काही कारणास्तव ते बंद झाले. २०१९ मध्ये भारतातील प्रख्यात शेफ विष्णूजी मनोहर बे एरियात भेटीवर आले असताना तुषार कोठळकरांची विष्णूजींशी भेट झाली. त्यावेळी उपहारगृह सुरु करण्याचा प्रस्ताव मांडला आणि २०१९ साली सनीव्हेल येथेच सध्याचे प्रसिद्ध 'विष्णूजी की रसोई' हे शाकाहारी पदार्थांचे उपहारगृह सुरु करण्यात आले. उपाहारगृहाच्या बाजूलाच मोठा हॉल असल्याने, ती जागा वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी तसेच मिटींग्ससाठी भाड्याने देण्यात येते. त्या आधी २०१० साली समीर आणि तुषारनी 'India Chat Cuisine' नावाचे उपहारगृह सुरु केले होते.

२०१९ साली गणेश गौरसार या तरुण शेफने बे एरियातील मिलपिटास येथे Food Truck सुरु केला आणि २०२१ मध्ये

Santa Clara येथे 'स्वराज' नावाने शाकाहारी आणि मांसाहारी अशा दोन्ही पदार्थांचे उपहारगृह चालू केले. त्यानंतर २०२४ मध्ये स्वराजने San Ramon येथे याच नावाचे आणखी एक उपहारगृह चालू केले. स्वराजचे बे एरियातील फ्रेमॉण्ट या शहरात लवकरच उपहारगृह सुरु होणार आहे तसेच, अमेरिकेतील सिएटल, शिकागो, लॉस एंजलीस, न्यू जर्सी सारख्या मोठ्या शहरात Franchise उपाहारगृहे सुरु करण्याचा मानस आहे. स्वराजचे वैशिष्ठ्य म्हणजे, महाराष्ट्रातील कोल्हापुरी, कोंकणी, खानदेशी तसेच विदर्भ अशा वेगवेगळ्या भागातील पदार्थांची चव चाखायला मिळते.

बे एरियातील आणखी मराठी उपहारगृह मालक म्हणजे रोशन शिवलकर आणि त्यांचे कुटुंबीय. रोशनने २०२० मध्ये COVID च्या काळात बे एरियातील Santa Clara या शहरात 'पुरणपोळी' नावाचे महाराष्ट्रीयन शाकाहारी पदार्थांचे उपहारगृह सुरु केले. बऱ्यापैकी जम बसल्यावर त्यांनी २०२४ मध्ये बाजूच्याच Sunnyvale ला 'सुरमई' नावाने उपहारगृह उघडले. सुरमईमध्ये शाकाहारी आणि मांसाहारी असे दोन्ही प्रकारचे पदार्थ मिळतात. येथील पदार्थांना खास कोंकणी पद्धतीची चव आहे. सुरमईला देखील लोकांची उत्तम दाद मिळाली. त्यानंतर वर्षाच्या आत २०२५ मध्ये शिवलकरांनी Sunnyvale मधेच 'Frankie' नावाचे इंडो-चायनीज उपहारगृह सुरु केले. या सर्व व्यवसायात त्यांना त्यांच्या मोठ्या बहिणीची, तीच्या नवऱ्याची आणि आईची साथ मिळाली. आई मुख्य शेफ असल्यामुळे पदार्थांना अस्सल कोंकणी चव आली आहे. फार थोड्या कालावधीत शिवलकरांनी धडाडीने या व्यवसायाचा विस्तार करून जम बसवला आहे हे खूप कौतुकास्पद आहे.

या सर्व उपाहारगृहांना लोकांनी चांगली दाद दिली आहे, त्यामुळे या सर्वांचं कौतुक करावं तेव्हढं थोडंच. या सर्व तरुण मंडळींनी मराठी माणसांची खाण्याची चांगली सोया करून दिल्याबद्दल तसेच इतर परप्रांतीयांनाही मराठी पदार्थांची ओळख करून दिल्याबद्दल या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

- **प्रमोद तेंडुलकर**, फ्रेमॉण्ट , कॅलिफोर्निया

बदलत्या आकाशाच्या नव्या वेधशाळा

दरवर्षी दोनदा काही हजार अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ अमेरिकन ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटीच्या (AAS) बैठकीसाठी एकत्र येतात. या बैठकीत व्याख्याने आणि पोस्टर सादरीकरणे असतातच, पण त्याशिवाय नव्या दुर्बिणी, अवकाशमोहिमा, आणि सुरू असलेल्या प्रकल्पांबद्दल थेट माहिती मिळते. AAS ची २४७ वी बैठक जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात फिनिक्सच्या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये झाली. Nancy Grace Roman Space Telescope (या पुढे 'रोमन') च्या एका सत्रात मी पॅनेलीस्ट म्हणून हजर होतो. रोमनकडून सुरुवातीला मिळणारा डेटा वर्गीकृत कसा करायचा, आणि तो मिळू लागेपर्यंत simulation वापरून तयारी कशी करायची याबद्दल आम्ही तिथे बोललो. प्रत्यक्ष डेटा मिळू लागल्यावर प्रयोग करायला वेळ नसतो. त्यामुळे तेजस्विता बदलणारे तारे, सुपरनोव्हा किंवा इतर ट्रांझियंट स्त्रोत वगैरे - अशा गोष्टी प्रत्यक्ष निरीक्षणातून समोर येण्याआधीच डेटा हाताळायची यंत्रणा तयार करून ठेवणे आणि तिची चाचणी घेणे आवश्यक असते. ही पद्धत खगोलशास्त्रात नवीन नाही. सगळे योजनेबरहुकूम झाले, तर रोमन २८ सप्टेंबर २०२६ ला लॉंच होईल.

याच AAS बैठकीत Schmidt Sciences या जनहितदायी (philanthropic) संस्थेने एक महत्त्वाची घोषणा केली. त्यांनी चार मोठ्या खगोलशास्त्रीय वेधशाळांना मदत जाहीर केली: तीन पृथ्वीवरच्या आणि एक अवकाशातील. या सगळ्यांना मिळून Schmidt Observatory System (या पुढे 'Schmidt वेधशाळा') असे नाव देण्यात आले आहे.

या उपक्रमामागची कल्पना थोडक्यात अशी: आकाशावर सतत नजर ठेवणाऱ्या वेधशाळा वेगवेगळ्या तरंगलांबींमध्ये (रेडिओ, दृश्यमान प्रकाश, वगैरे) एकत्रितपणे काम करतील, आणि त्यांचा डेटा जगभरातील वैज्ञानिकांसाठी विनाअट उपलब्ध असेल. रेडिओ तरंगलांबींवर काम करणारा Deep Synoptic Array (DSA), दृश्यमान प्रकाशात निरीक्षणे करणारा Argus, आणि LFAST नावाची वर्णपट (spectrum) मिळवणारी मोठी सुविधा हे भूपृष्ठावरील प्रकल्पही य़ात अंतर्भूत आहेत.

या सगळ्यांना पूरक म्हणून अवकाशात Lazuli ('लाझूली') नावाची एक नवी दुर्बीण असेल. इतर वेधशाळांनी शोधलेल्या घटनांचा झपाट्याने पाठपुरावा करण्यासाठी ही खास तयार करण्यात येत आहे. आकाराने ही दुर्बीण हबल स्पेस टेलिस्कोपपेक्षाही

मोठी, तीन मीटर व्यासाची असेल. अवकाशस्थ असल्याने ही हबलप्रमाणेच पृथ्वीच्या वातावरणामुळे होणारे बदल टाळत जास्त थेट निरीक्षणे घेऊ शकेल.

निरीक्षणांसाठी ही दुर्बीण इतर दुर्बिणींपेक्षा वेगाने आकाशाच्या एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे वळू शकेल. आकाशाचा संथ, सर्वेक्षणात्मक अभ्यास करण्याऐवजी, इतर दुर्बिणींनी शोधलेल्या घटनांवर ती पटकन लक्ष केंद्रित करून सखोल निरीक्षणे घेऊ शकेल. रोमन मोठ्या प्रमाणावर, प्रकाशाच्या अतिरक्त (infrared) तरंगलांबींवर, पद्धतशीर निरीक्षणे करेल, अनेक स्रोत आणि घटनांच्या सूची बनवेल. मग, लाझूली त्यातल्या निवडक शोधांचा पाठपुरावा करेल. जसे की, हा स्त्रोत नेमका कोणत्या प्रकारचा आहे? त्याची तेजस्विता कशी बदलते आहे? त्याच्या प्रकाशाच्या वर्णपटातून त्याच्या भौतिक स्वरूपाबद्दल काय कळते? वगैरे. म्हणूनच लाझूली आणि रोमन या दोन दुर्बिणी एकमेकांच्या नैसर्गिक जोडीदार ठरतात.

अशा प्रकारची समन्वयित निरीक्षणे आजच्या खगोलशास्त्रात नवी नाहीत. पण या मार्गक्रमणात लाझूली अनेक पावले पुढे असेल. ज्याप्रमाणे दूरवरच्या दिव्यांचा प्रकाश आपल्याला क्षीण भासतो, त्याचप्रमाणे अवकाशात दूर असलेल्या स्रोतांचा प्रकाश क्षीण भासतो. हबल, जेम्स वेब, आणि पुढे रोमन, या सगळ्या अवकाशस्थ दुर्बिणी, तसेच पृथ्वीवरून ZTF, LSST/रूबीन सारख्या दुर्बिणी सूक्ष्म आणि संवेदनशील निरीक्षणे मिळवतात, पण या दुर्बिणी झपाट्याने, नवीन अल्पायुषी स्रोतांचा पाठपुरावा करू शकत नाहीत. आणि दररोज असे लाखो स्रोत शोधण्याची क्षमता सध्याच्या दुर्बिणींमध्ये आहे. अशा वेळी, वातावरणमुक्त अवकाशातून तात्काळ आणि दर्जेदार निरीक्षणे मिळणे फार महत्त्वाचे ठरते. काही वेळा भूपृष्ठावर adaptive optics उपयोगी पडतात, पण ते सगळ्या दुर्बिणींवर उपलब्ध नाहीत. रोमनसारख्या नव्या दुर्बिणीच्या डेटा प्रणालीवर काम करणाऱ्या माझ्यासारख्या व्यक्तीच्या दृष्टीने हे विशेष महत्त्वाचे आहे. सुरुवातीचा डेटा अनेकदा अपरिचित आणि गोंधळात टाकणारा असतो. अशा वेळी जलद, दर्जेदार पाठपुरावा अशा गूढ भासणाऱ्या संकेतांना समजण्याजोग्या शोधात रूपांतरित करू शकतो. Schmidt प्रणालीतील भूपृष्ठावरील वेधशाळाही लाझूलीइतक्याच महत्त्वाच्या आहेत, जरी त्या सर्वसामान्यांना कमी आकर्षक भासल्या तरी. त्यातल्या DSA या रेडिओ दुर्बिणींच्या संकल्पनेचा जन्म मी काम करत असलेल्या कॅलटेकमध्येच झाल्यामुळे माझ्यासाठी ती विशेष जवळची आहे. रेडिओ आकाशावर सतत नजर ठेवणे आणि fast radio bursts (सेकंदापेक्षाही कमी कालावधीचे अतिउर्जावान रेडिओ तरंगलांबीतील स्फोट) सारख्या अल्पायुषी आणि आपल्याला अजूनही रहस्यमय भासणाऱ्या घटनांचा शोध घेणे हे तिचे उद्दिष्ट आहे. कॅलटेकला काळानुसार बदलणाऱ्या खगोलीय घटनांच्या अभ्यासाची (याला time-domain astronomy म्हणतात) दीर्घ परंपरा आहे. खगोलशास्त्राच्या या उपशाखेत आकाशाचे केवळ फोटो घेण्याऐवजी बऱ्याच अंतराने एकाच भागाचे फोटो घेऊन जणू आकाशाची एखादी स्लो-मोशन चित्रफीत मिळवली जाते. खरेतर दोन निरीक्षणांमधले अंतर कमी करून जास्त वेगवान फिल्म बनवणे आम्हाला आवडेलच, पण ते मोठ्या दुर्बिणींसाठी खूपच खर्चिक असते. कॅलटेकचा आतापर्यंतचा भर दृश्यमान प्रकाशातील निरीक्षणांवर होता. Digitized Palomar Observatory Sky Survey (DPOSS), Catalina Real-time Transient Survey (CRTS), आणि अलिकडील Zwicky Transient Facility (ZTF) सारख्या प्रकल्पांनी बदलत्या आणि अल्पजिवी घटना शोधण्याची आणि वर्गीकृत करण्याची मूलभूत संगणकीय पद्धत विकसीत केली. DSA हीच परंपरा रेडिओ तरंगलांबींत पुढे नेते. तत्त्व तेच आहे: आकाशाकडे सतत पाहत राहायचे, आणि घडणारे बदल टिपत रहायचे. पण भौतिकी वेगळी असल्यामुळे, विचारले जाणारे प्रश्नही वेगळे असतात. दृश्यमान आणि रेडिओ अशा दोन्ही प्रकारच्या निरीक्षणांमुळे एकत्रितपणे अधिक समृद्ध चित्र उभे राहते.

Schmidt प्रणालीतील आणखी एक घटक म्हणजे Argus. ही अनेक छोट्या दुर्बिणींची रचना आहे, जी आकाशाच्या मोठ्या भागांचं, सतत निरीक्षणे करते. तिची ताकद एका निरीक्षणात नसून, सातत्याने चालू असलेल्या निरीक्षणांत आहे. या अर्थाने ती ZTF सारख्या प्रकल्पांना पूरक आहे: ZTF अधिक संवेदनशील आणि उच्च दर्जाची स्लो-मोशन चित्रफित देतो, तर Argus चलचित्र देत काळाच्या ओघात होणारे बदल टिपून ठेवतो; आणि मग मोठ्या दुर्बिणी त्यांचा तपशीलवार अभ्यास करू शकतात.

ZTF सारख्या सर्वेक्षणांतून हे स्पष्ट झाले आहे की एखादी क्षणिक घटना समजून घेण्यासाठी तिचा आधीचा इतिहास तितकाच महत्त्वाचा असतो, जितका शोधाचा क्षण. Argus सारख्या सुविधा हा कालगत संदर्भ मोठ्या प्रमाणावर पुरवतात, आणि मग इतर संसाधने तपशीलवार अभ्यासासाठी वापरता येतात. जिथे वेगवेगळ्या सुविधा एकमेकांना पूरक ठरतात अशा समन्वयित व्यवस्थांवर आजचे खगोलशास्त्रीय शोध अवलंबून आहे.

Schmidt वेधशाळेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे डेटा खुलेपणाने उपलब्ध करून देण्यावर दिलेला भर. NASA चा डेटा देखील असाच खुलेपणाने उपलब्ध असतो. त्यामुळे अधिक संशोधक एकाच वेळी डेटा वापरू शकतील, विश्लेषण पद्धती तपासू शकतील, आणि वर्गीकरण साधने विकसित करू शकतील. रोमनसारख्या मोहिमांसाठी, जिथे सुरुवातीचा डेटा आणि जलद प्रतिसाद हे मोठे आव्हान असते, अशी खुलेपणाची भूमिका संपूर्ण समुदायाचा सहभाग वाढवू शकते आणि कामाची गतीही. मात्र सर्व वेधशाळा एकसारख्या अटींवर डेटा उपलब्ध करून देत नाहीत -- ZTF/LSST अनेक महिने डेटा स्वत:च्या सदस्यांसाठी राखीव ठेवतात.

Schmidt च्या खुल्या धोरणांकडे थोडे व्यापक दृष्टिकोनातून बघितले तर लोककल्याणासाठी वैज्ञानिक पायाभूत सुविधा सतत कार्यरत राहणे किती महत्त्वाचे असते, ते लक्षात येते. लाझूलीसारख्या सुविधा मुख्यतः सरकारी निधीतून उभ्या राहिल्या आहेत, आणि हेच मॉडेल हितकारी असते; कारण अशा व्यवस्थेत पैसे कुठे आणि कसे वापरायचे, हे काही मोजक्या लोकांनी नव्हे तर राष्ट्रीय समित्यांनी समन्वयाने ठरवलेले असते. पण सातत्याने अशा सुविधा उभ्या करणे, त्या कार्यरत ठेवणे ह्यासाठी समाजाकडून आर्थिक सहयोग मिळाला तर वैज्ञानिक संशोधनांमध्ये अधिक जोखीम घेण्याची तयारी, तत्पर निर्णय घेण्याची गरज किंवा वेगळ्या संघटनात्मक रचना ह्यांसारख्या गोष्टीही शक्य होतात. येथे philanthropy ही सार्वजनिक गुंतवणुकीची जागा घेत नाही, तर तिला पूरक ठरते.

भारतात आणि भारताबाहेरही विज्ञान, तंत्रज्ञान आणि त्याच्याशी संबंधित उद्योगांच्या प्रगतीत भारतीयांचा मोठा वाटा आहे. तरीही मूलभूत वैज्ञानिक पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर देणग्या देण्याची परंपरा आपल्याकडे अजून फारशी रुजलेली नाही. अशा गुंतवणुकांचे फायदे तात्काळ दिसत नाहीत, पण ते दीर्घकाळ टिकणारे असतात. भारतात, आपल्या समाजात मंदिरे, देवधर्माच्या पारंपरिक जागा यांसाठी बरेचदा देणग्या दिल्या जातात. किंवा मग समाजोपयोगी कामे करणाऱ्या संस्था ह्या सगळ्यांसाठी वापरता येतील अशी सामायिक साधने उभी करतात. खुला डेटा आणि आंतरराष्ट्रीय सहभाग यांची परंपरा असलेल्या खगोलशास्त्रात, अशी गुंतवणुक झाल्यास ती प्रादेशीक न राहता तिला जागतिक महत्त्व प्राप्त होते.

Schmidt वेधशाळा खगोलशास्त्रातात होत असलेल्या काही महत्त्वाच्या बदलांचे प्रतीक आहे: time-domain astronomy वरचा वाढता भर, वेगवेगळ्या तरंगलांबींतील समन्वय, डेटा खुलेपणाने उपलब्ध करून देणे, आणि सार्वजनिक संस्था व खासगी philanthropy यांच्यातील नवी भागीदारी. पुढील काही वर्षांत या वेधशाळा कार्यरत झाल्यावर, त्यांनी निर्माण केलेला डेटा स्वतंत्र प्रकल्पांच्या पलीकडे जात भरीव संशोधन घडवून आणेल.

आकाशात होणारे बदल पाहणे हे खगोलशास्त्राच्या केंद्रस्थानी नेहमीच राहिले आहे. बदलते आहे ते निरीक्षणे कशी संघटित केली जातात आणि कशी उपलब्ध केली जातात: वेगवेगळ्या सुविधांमध्ये, वेगवेगळ्या शाखांमध्ये, आणि वेगवेगळ्या निधी मॉडेल्समध्ये. Schmidt वेधशाळेचा उपक्रम अशा दृष्टिकोनाचा एक ठोस नमुना म्हणून पुढे येतो. पुढील दशकात हा डेटा प्रत्यक्षात किती खुलेपणाने आणि प्रभावीपणे वापरला जातो, हेच या उपक्रमाचे खरे मोजमाप ठरेल.

Image created with ChatGPT 5.2

- **आशिष महाबळ**, पॅसडीना, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

सत्त्व ते शिवत्व – एक अंतर्मुख प्रवास

शिव म्हणजे शंकर, शिव म्हणजे परमसत्य, शिव म्हणजे साकार देव तसेच निर्गुण तत्व. अश्या ह्या शिवाच्या आत्मचिंतनातून शिवत्व प्रकट होते. दर महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्दशीला येणारी शिवरात्र शिवाच्या पूजेने साजरी केली जाते. ही पूजा भगवान शिवाच्या भक्तांसाठी आध्यात्मिक प्रगती, जीवनातील नकारात्मक उर्जा कमी करणे त्या दृष्टीकोनातून महत्त्वाची मानली जाते. शिव म्हणजे जे दिसत नाही, ज्याला आकार नाही, पण जे सर्वत्र आहे. जे काही दिसते ते निर्मिती आहे, पण जे न दिसणारे, रिकामे असल्यासारखे वाटते तीच सर्वात मोठी आणि खरी उपस्थिती आहे आणि त्यालाच शिव म्हणतात. आपल्याला आजूबाजूला दिसणाऱ्या सगळ्या गोष्टी म्हणजे निर्मिती आहे.पण त्या सगळ्या गोष्टी ज्या जागेत आहेत, ती मोकळी जागा दिसत नाही तरी ती सर्वात मोठी असते. ही न दिसणारी पण सर्वत्र असलेली जागा म्हणजेच शिव. उदाहरण द्यायचे झाले तर,

- मातीचे मडके ही निर्मिती आहे पण मडके महत्त्वाचं नसून त्यातली पोकळीच उपयोगी असते आणि तीच शिव आहे.
- स्पंज आपल्याला घन दिसतो, पण त्यात खूप मोकळी जागा असते. ही मोकळी जागा नसती तर स्पंज पाणी धरू शकला नसता. म्हणजे दिसणारा पदार्थ स्पंज आहे, पण न दिसणारी पोकळीच खरी उपयोगी आहे. त्याचप्रमाणे, जे दिसत नाही पण काम करतं, परिणाम घडवतं, त्यालाच 'शिव' असं म्हणतात.

दर महिन्याच्या शिवरात्रीला शिवाची पूजा केली जाते आणि त्यामुळे अंधार, अज्ञानावर मात करता येते असे मानले जाते. वर्षभरातल्या १२ शिवरात्रीमधल्या माघ महीन्याच्या कृष्ण पक्षाच्या चतुर्दशीला येणाऱ्या शिवरात्रीला महाशिवरात्र म्हणतात, जी सर्वात महत्त्वाची शिवरात्र. या दिवशी शिव पार्वतीचा विवाह झाला होता असे मानले जाते. त्यामुळे महाशिवरात्रीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आमच्या दृष्टीने महाशिवरात्रीचे विशेष महत्त्व आहे.



माझी आई दर दिवशी १२ पार्थिव शिवलिंगांची पूजा करून दुसऱ्या दिवशी त्याचे विर्सजन करत असे, हा प्रघात तिने तिच्या हयातीत अगदी शेवट पर्यंत पाळला.

नंतर काही काळाने मातीच्या अभावाने आईने मैद्याचे पीठ वापरून शिवलिंगाची पूजा करायला सुरवात केली होती. त्यात मग ती शिवाच्या वेगवेगळ्या प्रतिकांच्या आकारात शिवलिंगे करायची.

म्हणजे त्रिशूळ, ओम, चंद्र, नम:शिवाय हा मंत्र ह्या आकारामध्ये. कधी कधी आम्ही पण तिच्याबरोबर करु लागायचो, आता ते क्षण आठवून त्या क्षणांचे मोल आधिकच जाणवते.

महाशिवरात्रीची पूजा म्हणजे तिच्यासाठी जणू महाउत्सव होता, एक पर्वणी होती. आईला मदत करायची या विचारात आम्हीपण कधी त्याचा भाग झालो ते कळलेच नाही. नदीच्या पात्रातील पाय न लागलेली वाळू वापरुन तिची मोठी शाळुंका करून त्याची पूजा करायची. मग ती पूजा पांढऱ्या, पिवळ्या फुलांनी, बेलपत्राने सजवायची. हे सगळे करताना

आमचा आईला प्रश्न असायचा. हे सगळे केल्यामुळे काय मिळते. शिवपूजेचे काय महत्त्व आहे. कारण नेहमीच शिव, महादेव शंकर त्याचे सगुण, निर्गुणरूप हे जितके सोपे तेवढेच कठीण, खोल गर्भितार्थाचे आहे हे नक्की जाणवत होते. या सगळ्यावर आई हसत म्हणायची पहिले जरा शांतपणे देवासमोर तर बसा.

काही दिवसांपूर्वी आईने लिहून ठेवलेले वाचायचा योग आला त्यातून पूर्वी जे प्रश्न पडले होते त्याचे काही स्वरूपात निराकरण झाले असे म्हणायला हरकत नाही. महाशिवरात्री म्हणजे 'महान शिवाची रात्र'. अहंकार, अज्ञान, नकारात्मकता यांचा त्याग करून शिवतत्त्वाशी एकरूप व्हायला शिकवणारी. बाहेरच्या अंधारापेक्षा आतल्या अंधारावर विजय मिळवला पाहिजे हे सांगणारी रात्र. स्वतःशी भेट घडवणारी, शिवत्व जागवणारी पवित्र रात्र. जिथे अहंकार संपतो, द्वैत नाहिसे होते, अंत: करण पूर्ण शांत होते ती अवस्था म्हणजे शिवत्व.

शिवत्व म्हणजे परमेश्वराचे स्वरूप जे सर्वव्यापी आहे. जे शुद्ध चेतना आहे. शिवत्व म्हणजे केवळ भगवान शिवांचे रूप नाही तर मानवी चेतनेची शुद्ध जागृत अवस्था आहे. शिवत्व म्हणजे नुसती पूजा नसून अनुभूतिची अवस्था आहे. हे सगळे समजावून घेताना वाटत होते की हे कसे साध्य होते. महाशिवरात्रीच्या रात्री मौन राखून स्वत:कडे पाहण्याचा विचार पाहिजे. त्याने मी कोण आहे. या प्रकाराचा शोध सुरू होते. सत्त्व म्हणजे शुद्धता, संयम, सकारात्मक दृष्टी. मानवी स्वभावातील चांगुलपणा जो स्वतःला आत्मिक उन्नतीकडे घेऊन जातो ते म्हणजे त्याचे सत्त्व. शिवत्व म्हणजे केवळ शिव देव नाही तर एक कल्याणकारी अवस्था, सगळ्यांमध्ये एकत्व पाहण्याची दृष्टी, कल्याणाची भावना. सत्त्व ते शिवत्व हा प्रवास मनाची उंची वाढवतो. सत्त्व, सद्‌गुणांची सुरवात. शिवत्व, सर्वोच्च कल्याणाची अवस्था. शिव म्हणजे कल्याण, परम शांती, सत्य. जेथे द्वेष, अज्ञान, भय नाही ती अवस्था म्हणजे शिव. जे सत्य आहे, शुद्ध आहे तेच शिव.

शिवत्व म्हणजे शिवाची अवस्था, शिवगुणांनी युक्त जीवन स्थिती. शिवत्व म्हणजे अंतर्मनातील शिव जागृत होणे. दररोजच्या जीवनात रागावर संयम ठेवणे, निस्वार्थी सेवा करणे, सत्य बोलणे, माणुसकी जपणे. हे सगळे आचरणात आणणे म्हणजे शिवत्वाकडची वाटचाल.

हे सगळे वाचून अंतर्मुख व्हायला झाले. आईच्या विचारातून आईलाच समोर पाहात आहे असे वाटत होते. तो विचार मला महाशिवरात्रीच्या पूजेच्या दिवशी घेऊन गेला. आईने बेलाची पाने वाहून केलेली पूजा, वडीलांचे धीरगंभीर आवाजात म्हणलेले शिवमहिम्न स्तोत्र. ह्या सगळ्याने केलेली महाशिवरात्रीच्या प्रथम प्रहराची पूजा. सगळे डोळ्यासमोर दिसत होते तसेच काही काही प्रमाणात त्याचे आकलन पण होत होते.

महाशिवरात्र, शिवाची पूजा, शिवत्व कळण्याचा प्रयत्न हे सगळे वर वर पाहता नुसतीच पूजा करणे नाही तर स्वत:ने स्वतःला ओळखणे, स्वतः मधले अज्ञान दूर करणे. अज्ञान म्हणजे फक्त लौकीकार्थाने केलेले ज्ञान संपादन नाही तर जगाकडे, दुसऱ्यांकडे पाहण्याची दृष्टी बदलणे, संवेदनाक्षम होणे. वागण्यात सकारात्मकता आणणे.

यालाच सत्त्वातून शिवत्वाकडे जाण्याचा एक अंतर्मुखी प्रवास म्हणता येईल.

(आई वडीलांच्या टिप्पणींवर आधारीत)

- **उत्तरा भालेराव**, टॅम्पा, फ्लोरिडा





बृहन्महाराष्ट्र मंडळ
SEATTLE, AUG 6-9, 2026
BMM IS INVITING NOMINATIONS
• BMM AWARDS
• BMM BOOK PUBLICATION
• BMM YOUTH SCHOLARSHIPS
• HOSTING THE NEXT BMM CONVENTION
FOR MORE INFORMATION VISIT BMM WEBSITE
https://bmmonline.org


महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांना अखेरचा सलाम...! समाजाच्या तळागाळाशी जोडलेले, समाजोपयोगी कार्यासाठी झपाटलेले एक लोकाभिमुख व्यक्तिमत्व! कार्यकुशल, निर्णयक्षम आणि स्पष्टवक्त नेता नियतीने महाराष्ट्रापासून अकाली हिरावून घेतला आहे!
ही महाराष्ट्रासाठी कधीही भरून न येणारी हानी आहे. दादांच्या आणि या भीषण विमान अपघातात बळी पडलेल्या सर्वांच्या स्मृतीस बृहन्महाराष्ट्र परिवाराचे अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली! 🙏
मा. अजित दादा पवार
१९५९ - २०२६

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.

Mountain House - New Paltz
Artist: Pratima Lele
Dimensions:8″x10″
Medium: Watercolor
Price:$300
Mandal: Marathi Vishwa NJ

Sacred Serenity
Artist: Kanchan Tare
Dimensions: 24″ square
Medium: Acrylic and mix media (framed canvas)
Price:$2000

A Burst of Passion
Artist: Priya Welankar Shah
Dimensions:30″x30″
Medium: Oil
Price:$2500
Mandal: Triveni

Cannyonland
Artist: Shubhangi Mantri
Dimensions: 22″x30″
Medium:Mixed Media
Price:$1000
Mandal: Dallas Ft. Worth Maharashtra Mandal



Plumeria
Artist: Neelima Gole
Dimensions:12″x 9″
Medium: Watercolour
Price:$350
Mandal:Jacksonville Maharashtra Mandal

Northwest fall
Artist: Vinita Mohite
Dimensions:9″ x 12″
Medium: Watercolor
Price:$250
Mandal: Seattle MM

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.

Annual Financial Report:
Year 2025

प्रिय BMM सदस्यांनो,

१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील अंतरिम आर्थिक ठळक बाबी खाली दिल्या आहेत.

मुख्य ठळक मुद्दे

- सर्व BMM उपक्रमांसाठी उपक्रमनिहाय उत्पन्न व खर्चाचा तपशील नफा-तोटा (Profit & Loss) अहवालात दिला आहे.
- या कालावधीत आम्ही कीर्तन, मराठी बालभाषा, पौरोहित्य प्रशिक्षण, ज्योतिषशास्त्र, संस्कृत आणि गायन वर्ग यशस्वीपणे राबवले.
- BMM मराठी शाळा २०२५ मध्ये सातत्याने प्रगती करत असून आमच्या सर्वात मजबूत उपक्रमांपैकी एक ठरत आहे.
- BMM समर युवा मेंटॉरशिप प्रोग्राम यशस्वीरीत्या पार पडला असून हायस्कूल व कॉलेजमधील विद्यार्थ्यांकडून अतिशय सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.
- आमच्या प्रोग्रामिंग टीमने भारत-आधारित सहा प्रमुख कार्यक्रम यशस्वीपणे साकारले. यामधील सर्वाधिक यशस्वी कार्यक्रम म्हणजे प्रशांत दामले यांचा "शिकायला गेलो एक (SGE)" दौरा.
- आमच्या टीमने विविध मंडळांसाठी ६ मराठी चित्रपटांचे टेलिकास्ट अत्यंत वाजवी खर्चात केले.
- मैत्री मेळावा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी BMM समितीने डॅलस आणि क्लीव्हलँड टीमसोबत समन्वय साधला.
- रेशिमगाठी – न्यू जर्सी भेट, मराठी विश्व यांच्या सहकार्याने १२ जुलै रोजी पार पडली व ती अत्यंत यशस्वी ठरली. तसेच, १२ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र मंडळ बे एरियाच्या सहकार्याने फ्रॅमोंट येथे पश्चिम किनाऱ्यावरील रेशीमगाठीचा कार्यक्रमही अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.
- "समाजरंग" उपक्रमांतर्गत आम्ही एकूण $39,420 इतकी देणगी संकलित केली. सखोल पडताळणीनंतर खालील चार संस्थांना ही रक्कम वितरित करण्यात आली:
    - Save Indian Farmers
    - Maharashtra Foundation
    - Jnana Prabodhini Foundation
    - Sewa International
    - CM Relief Fund
- आम्ही MANA – महाराष्ट्रीयन आर्टिस्ट ऑफ नॉर्थ अमेरिका हा नवीन उपक्रम सुरू केला असून, चित्रकला, स्केचेस, फोटोग्राफी व डिजिटल आर्ट यांसाठी कलाकारांना एक व्यासपीठ व नेटवर्क उपलब्ध करून देणे हा यामागील उद्देश आहे. आतापर्यंत ३० सदस्यांनी नोंदणी केली आहे.

ही सर्व यशस्वी कामगिरी आमच्या समर्पित स्वयंसेवक व भागीदार मंडळांच्या पाठबळामुळेच शक्य झाली. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

आपला,

संतोष साळवी, BMM कोषाध्यक्ष

BMM NORTH AMERICA INC
Balance Sheet
As of December 31, 2025

2:10 PM
01/26/2026
Accrual Basis

	Dec 31, 25
ASSETS	
Current Assets	
Checking/Savings	
7 Month Featured CD - 1985	75,000.00
BANK OF AMERICA - SAVING # 5826	50,044.36
BANK OF AMERICA CHK - # 4341	110,193.86
PAYPAL	16,948.33
Zeffy US	7,600.00
Total Checking/Savings	259,786.55
Other Current Assets	
COMMONWEALTH FINANCIAL NETWORK	702,747.03
Total Other Current Assets	702,747.03
Total Current Assets	962,533.58
Other Assets	
SEED MONEY SEATTLE	20,000.00
Total Other Assets	20,000.00
TOTAL ASSETS	982,533.58
LIABILITIES & EQUITY	
Equity	
GENERAL FUND	222,245.80
Opening Bal Equity	8,370.17
Retained Earnings	602,147.57
Net Income	149,770.04
Total Equity	982,533.58
TOTAL LIABILITIES & EQUITY	982,533.58

BMM NORTH AMERICA INC

Profit & Loss

January through December 2025

	Accrual Basis
	Jan - Dec 25
Ordinary Income/Expense	
Income	
ADVERTISEMENT INCOME	1,169.00
BMM Courses & Initiatives	
Kirtan	825.00
Marathi Bolibhasha	1,400.00
Sanskrit Class	150.00
Shastriya Sangeet	0.00
Sugam Sangeet	1,280.00
Total BMM Courses & Initiatives	3,655.00
BMM Marathi Yuwa Summer Mentori	4,125.00
BMM Samajrang	
Marathawada Flood Relief	38,325.00
BMM Samajrang - Other	0.00
Total BMM Samajrang	38,325.00
DONATION	11,119.53
INDIA PROGRAMMING	
Dhanashree Lele Program	18,250.00
Dharohar	45,162.51
Indradhanu	5,740.00
Jar Tar Chi Gosta	23,045.27
Shikayala Gelo Ek	172,473.00
INDIA PROGRAMMING - Other	22,335.80
Total INDIA PROGRAMMING	287,006.58
INTEREST INCOME	8.29
MANA Membership	400.00
MARATHI MOVIE	
Abhanga Tukaram	8,100.00
Asambhav	1,050.00
Bin Lagnachi Goshta	1,100.00
Fussclass Dabhade	2,025.00
Mukkampost Bombilwadi	575.00
MARATHI MOVIE - Other	475.00
Total MARATHI MOVIE	13,325.00

MARATHI SHALA EXAM FEES & BOOKS	85,225.82
Marathi Shala Online course	4,930.00
Membership	5,900.00
PAUROHITYA	14,400.00
Reshimgathee	
Meetup NJ	20,565.00
Meetup Portland	101.00
Membership	23,368.32
Total Reshimgathee	44,034.32
VRUTTA	
NEWS LETTER-ADV	965.00
VRUTTA MEMBERSHIP	1,400.00
Total VRUTTA	2,365.00
Total Income	515,966.54
Expense	
BANK SERVICE CHARGES	1,037.33
BMM Samajrang Donation	
Marathawada Flood	33,650.00
Total BMM Samajrang Donation	33,650.00
COMPUTER EXPENSES	555.24
CONVENTION RELATED	25.00
Donation Exp	0.00
DUES AND SUBSCRIPTION	2,677.34
INDIA PROGRAMMING EXPS	
Dhanashree Lele Program	13,491.24
Dharohar	46,006.15
Indradhanu	5,740.00
Jar Tar Chi Goshta	37,414.26
Shikayala Gelo Ek	139,823.84
Total INDIA PROGRAMMING EXPS	242,475.49
INSURANCE	1,182.58
MAITRI MELAWA EXPENSE	
DALLAS FORT	23,789.22
Total MAITRI MELAWA EXPENSE	23,789.22
MARATHI MOVIE EXPENSE	
Abhanga Tukaram	8,000.00
Asambhav	1,575.00
Bin Lagnachi Goshta	1,050.00
Fussclass Dabhade	2,050.00
Mukkampost Bombilwadi	3,825.00
MARATHI MOVIE EXPENSE - Other	36.50
Total MARATHI MOVIE EXPENSE	16,536.50
MARATHI SHALA EXPS	20,906.56
MISC. EXPS	273.42

PAUROHITYA EXP	5,875.00
PROFESSIONAL FEES	
Accounting	1,099.00
Total PROFESSIONAL FEES	1,099.00
Reshimgathee Exp	
Meetup NJ	16,824.42
Total Reshimgathee Exp	16,824.42
WEBSITE EXPENSE	860.00
Total Expense	367,787.10
Net Ordinary Income	148,201.44
Other Income/Expense	
Other Income	
Other Income	1,568.60
Total Other Income	1,568.60
Net Other Income	1,568.60
Net Income	149,770.04